आला आला जबरदस्त हिवाळा
। स्वेटर्स । जॅकेट। 2 in 1 जर्किन
। टोपी । ग्लोज । सॉक्स । मफलर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी.
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505
जरीवाला मेन्स, महाजनवाडी, अहिल्यानगर.मो. 9850216268

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

उत्सव लॉन्स अँण्ड बँक्वेट्स
सोहळा होईल दिमाखदार
utsav LAWNS & BANQUETS
लग्न, साखरपुडा, मौंज, वाढदिवस, कॉर्पोरेट इव्हेंट्ससाठी सुयोग्य ठिकाण.
एसी बँक्वेट हॉल | भव्य लॉन | प्रशस्त पार्किंग | AC रूम्स
बुकींग संपर्क - 7410 510 376 | 7385 951 303

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २७.१०.२०२५ | अंक नं. १७० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

डबल फायदा
सर्व दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
Conditions Apply*
+ जेवढ्या वजनाचे सोने तेवढ्या वजनाची चांदी
चक्क फ्री*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
पाहिजेत
सुवर्णक्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी.
कॅशियर जागा : 4 (पुरुष)
मोड कारागीर जागा : 4 (पुरुष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 17000/- ते 18000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह मंगळवार ते शनिवार सकाळी 11 ते 2 वाजेलेत समक्ष भेटावे.

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

हायलाईट्स ऑफ राजस्थान
Just 41000 ६ दिवस
उदयपुर, चित्तोडगड, पुष्कर, जयपुर
चलो बँग भरो.. निकल पडो...
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
9112384842, 9850063432

# चिकनच्या दुकानातून गोमांसची विक्री

## झेंडीगेट परिसरात पोलिसांचा छापा, ५३० किलो गोमांस जप्त, चौघांना पकडले

नगर - नगर शहरातील झेंडीगेट परिसरातील अवैध कत्तलखाने महापालिका आणि पोलिस प्रशासनाने उध्वस्त केलेले असताना या परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल सुरु असल्याचे समोर आले असून गोवंशीय जनावरांची कत्तल करून चिकन च्या दुकानात गोमांसची विक्री करणाऱ्यांचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने भांडाफोड केला आहे. या ठिकाणी छापा मारुन गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्या चौघांना पकडले, तर दोघे पसार झाले. या ठिकाणी पोलिसांनी १ लाख ५९ हजार ५०० रुपये किंमतीचे ५३० किलो गोमांस जप्त केले आहे.

झेंडीगेट परिसरातील अशरफी मस्जिदचे बाजूला असलेल्या लकी फ्रेश चिकन शॉप या दुकानात २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ६.२७ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली आहे. झेंडीगेट परिसरात चिकन च्या दुकानामध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करण्याचे उद्देशाने जिवंत जनावरे आणलेले असुन ते जनावरांचे कत्तल करणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने झेडीगेट येथे जावुन खात्री केली असता काही इसम लकी फ्रेश चिकन दुकानामध्ये गोवंशीय जनावरांचे कत्तल करतांना दिसुन आले. तेव्हा पथकाने सदर ठिकाणी छापा टाकण्यासाठी जात असतांना पोलीसांची चाहुल लागताच काही इसम तेथुन पळुन गेले. पोलिस पथकाने तेथे तोहीद नूर कुरेशी (वय १९, रा.डावरे गल्ली, झेंडीगेट), सोहेल इक्बाल कुरेशी (वय २६, रा. सदर बाजार, भिंगार), समीर शफीक कुरेशी (वय ३३, रा. सदर बाजार, भिंगार), रिजवान मोहम्मद हुसेन कुरेशी (वय ३६, रा. सदर बाजार, भिंगार) या चौघांना पकडले. कैफ मुनावर कुरेशी (रा.सुभेदार गल्ली, झेंडीगेट), वाशिफ मुनावर कुरेशी (रा.सुभेदार गल्ली, झेंडीगेट) हे तेथून पळून गेले. पथकाने त्या ठिकाणी १ लाख ५९ हजार ५०० रुपये किंमतीचे ५३० किलो गोमांस जप्त केले.

पकडलेल्या आणि पळून गेलेल्या अशा ६ जणांच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात पो.कॉ.विशाल तनपुरे यांच्या फिर्यादी वरून भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, ३२५, ३(५), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५(अ), ५(ब), ५(क), ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखालील उपनिरीक्षक दिपक मेढे व पोलीस अंमलदार गणेश लोंढे, बिष्णु भागवत, विशाल तनपुरे यांनी केली. *(छायाचित्र पान ७ वर)*



शहरात कचरा संकलनाचा बोजवारा कायम असून कचरा उचलला न गेल्याने या ठिकाणी मोकाट जनावरांचा मुक्त वावर असतो. ही जनावरे कचरा रस्त्यावर पसरवतात, त्यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. महापालिकेने याबाबत उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



महापालिकेने डाळ मंडई येथील धोकादायक इमारत पाडली मात्र पाडलेलं साहित्य रस्त्यावरच. त्यामुळे वाहतुकीस होतोयं अडथळा. हे साहित्य तत्काळ उचलावा अशी मागणी व्यापाऱ्यांकडून होत आहे. (छाया - धनेश कटारिया)

कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
एक किलो मागे एक कोलगेट ब्रश फ्री..फ्री..
रत्नकमल चहा
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स
चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.

# साथी पोर्टल फेज-२ विरोधात राज्यभरातील व्यापाऱ्यांमध्ये नाराजी, कृषी सेवा केंद्रांचा २८ ऑक्टोबर रोजी एकदिवसीय 'लाक्षणिक बंद'

## अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यभरातील शेतकरी सेवा केंद्रांचा निषेध आंदोलन

नगर - राज्य शासनाच्या साथी पोर्टल फेज-२यानव्याप्रणालीविरोधातराज्यभरातील सर्व कृषी सेवा केंद्र धारक व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टीसाईड्स, सीड्स डिलर्स असोसिएशन (MAFDA) यांच्या आवाहनानुसार २८ ऑक्टोबर रोजी राज्यातील सर्व कृषी सेवा केंद्र एकदिवसीय लाक्षणिक बंद पाळणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. या आंदोलनाला अहिल्यानगर जिल्हा खते, बियाणे, किटकनाशके डिलर्स असोसिएशन यांनीही पाठिंबा दर्शविला असून, जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्र या दिवशी पूर्णपणे बंद राहणार आहेत. या निर्णयाची माहिती असोसिएशनचे सचिव संग्राम-दिलीप पवार व अध्यक्ष छबुराव किसनराव हराळ यांनी कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे दिली आहे.

असोसिएशनने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, साथी पोर्टल फेज-२ प्रणालीमुळे कृषी सेवा केंद्र चालविणाऱ्या विक्रेत्याना अत्यंत क्लिष्ट प्रक्रिया, तांत्रिक अडचणी तसेच व्यवहारात अनावश्यक विलंब यांचा सामना करावा लागत आहे. परिणामी शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक खते, बियाणे, कीटकनाशके यांसारख्या अत्यावश्यक वस्तू वेळेवर मिळण्यात मोठे अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हंगामी शेती नियोजनावर थेट परिणाम होत असून, कृषी उत्पादनावरही त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. शेतकरी वेळेवर पीक नियोजन करतात, मात्र प्रणालीतील विलंबामुळे खते-बियाण्यांचा पुरवठा उशिरा होत आहे, हे अन्यायकारक आहे, अशी भूमिका डिलर्स संघटनेने घेतली आहे.

या समस्येचा गांभीर्याने विचार करून शासनाने प्रणालीतील त्रुटी दुरुस्त कराव्यात, अशी मागणी असोसिएशनने केली आहे. आमचा हा बंद शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि प्रणालीतील कार्यक्षमतेसाठी एक प्रतिकात्मक आंदोलन आहे. शासनाने त्वरित उपाययोजना करावी, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलनाचा विचार करावा लागेल, असा इशारा सेक्रेटरी पवार व अध्यक्ष हराळ यांनी दिला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील कृषी सेवा केंद्र धारक व्यापारी या बंदला एकमुखी पाठींबा देत असून, स्थानिक स्तरावर शेतकरी बांधवांनाही या विषयाची जाणीव करून देण्यात येत आहे.

असोसिएशनने स्पष्ट केले आहे की, साथी पोर्टलचे उद्दिष्ट पारदर्शक व्यवहार असले तरी सध्याच्या प्रणालीत व्यवहारात तांत्रिक गुंतागुंत आणि नेटवर्क समस्येमुळे व्यापाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शासनाने कृषी सेवा केंद्र धारक व शेतकरी या दोन्ही घटकांचा विचार करून सुलभ, पारदर्शक व कार्यक्षम प्रणाली विकसित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर असोसिएशनच्या वतीने जिल्हा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांना निवेदन सादर करण्यात आले असून, या निवेदनाची प्रत राज्य शासनालाही पाठविण्यात आली आहे. प्रशासनाने शेतकरी बांधव व कृषी सेवा केंद्र धारक व्यापाऱ्यांच्या हितासाठी त्वरित पावले उचलावीत, अशी अपेक्षा या निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. साथी पोर्टल फेज-२ ही प्रणाली जरी पारदर्शकतेसाठी आणली असली तरी तिच्या तांत्रिक गुंतागुंतीमुळे व्यापाऱ्यांवर अन्याय होत आहे. शेतकरी वर्गालाही याचा फटका बसत आहे. शासनाने त्वरीत सुधारणा कराव्यात, हीच आमची मागणी आहे, असे छबूराव हराळ म्हणाले.

मरणोत्तर नेत्रदानाची वाट, अंध जीवनाची चैतन्यमय पहाट...
"मरणोत्तर नेत्रदान करुया, दोन अंधांचे अंधःकारमय जीवन प्रकाशमान करुया.."
स्व.श्री. बाळासाहेब शिवाजी पानसरे
पानसरे परिवाराच्या योगदानाबद्दल शतशः ऋणी आहोत.
डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिकचौक, अहिल्यानगर 414001
संपर्क मोबा.: 8888982222 / 9112288611

Antim Ardas
With profound grief we inform you of the Sad demise of
Sardarni Surinder Kaur Sacher
(wife of late Sardar Manjeet Singh Sacher)
on 24th Oct. 2025
ANTIM ARDAS will be held at
Gurudwara Govindpura, Ahilyanagar
on Tuesday 28th October, 2025 between 12 noon to 1pm
- Fondly Remembered By -
Sunpreet Singh - Dolphin Sacher (Son-Daughter In Law)
Manpreet Singh - Twinka Sacher (Son-Daughter In Law)
Jitendra Singh - Manmeet Kaur Arora (Son In Law - Daughter)
Sarabjeet, Ishmeet & Jasnoor (Grand Children)
Sacher, Vig, Sibal, Alag, Arora Families

# दिव्यांग व शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी नागपूरमध्ये महा एल्गार आंदोलन

## २८ ऑक्टोबर रोजी चलो नागपूरची हाक

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व दिव्यांग तालुकाध्यक्ष तसेच प्रहार दिव्यांग संघटनेचे सर्व दिव्यांग सदस्यांना नागपूर येथे होणाऱ्या महा एल्गार आंदोलनासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे, उत्तर जिल्हाध्यक्ष मधुकरराव घाडगे आणि महिला जिल्हाध्यक्षा लक्ष्मीताई देशमुख यांनी केले आहे. हे आंदोलन २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता नागपूर येथील कापूस संशोधन केंद्राच्या बाजूचे मैदान, परसोडी, वर्धा रोड, जामाठा येथे होणार आहे. या आंदोलनाद्वारे दिव्यांग बांधव आणि शेतकरी वर्गाच्या हक्क, आत्मसन्मान आणि अस्तित्वासाठीचा लढा उभारण्यात येणार आहे. प्रहार संघटनेच्या वतीने सांगण्यात आले की, हा लढा केवळ आंदोलन नाही, तर दिव्यांगांच्या जगण्याचा प्रश्न आहे. आपल्या मागण्यांसाठी सर्वांनी एकदिलाने नागपूर येथे उपस्थित रहावे.

सध्या दिव्यांग बांधवांना मिळणारे अडीच हजार रुपयांचे मानधन सहा हजार रुपयांपर्यंत वाढवावे, अशी प्रमुख मागणी आंदोलनात करण्यात येणार आहे. सरकारकडे ही मागणी संघटितपणे नागपूर आंदोलनातून मांडली जाईल. या आंदोलनात शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या लढ्यालाही बळकटी देण्यात येणार असून, दिव्यांग बांधव आणि शेतकरी हे एकत्र येऊन समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. संघटनेने जिल्ह्यातील सर्व दिव्यांगांना कोणत्याही गट-तटाचा विचार न करता दिव्यांग या एका झेंड्याखाली एकत्र या, नागपूरला चला! असे म्हटले आहे. प्रत्येक दिव्यांग बांधवाने या आंदोलनात सहभागी होऊन आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी लढा देण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
100% JOB ASSISTANCE
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING
ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
IN JUST 17900/-
Delhi Gate Branch: 9371051769
Old ST stand Branch: 9371151769
Pipeline Branch: 7447761769
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE

# गृहिणी

## आरोग्य

### सोडवा युरिक ॲसिडची समस्या

आपल्या शरीरात युरिक ॲसिडची पातळी वाढली तर त्यामुळे संधिवात, सांधेदुखी आणि किडनी स्टोन सारख्या समस्या उद्भवू शकतात. युरिक ॲसिड ही अशी समस्या आहे की जर आपण वेळीच त्यावर नियंत्रण ठेवले नाही तर ती हळूहळू वाढू लागते. ही समस्या सहसा आपल्या जीवनशैली आणि खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे उद्भवते. यामुळे हाडांना मोठे नुकसान होऊ शकते. ॲपल सायडर व्हिनेगर शरीराला डिटॉक्सिफाय करण्यास आणि वाढलेल्या यूरिक ॲसिडचे संतुलन राखण्यास मदत करते. जर एखाद्याला खूप जास्त यूरिकची समस्या असेल तर त्यांनी दिवसातून दोनदा १-२ चमचे ॲपल सायडर व्हिनेगर एका ग्लास पाण्यात मिसळून प्यावे. त्याचप्रमाणे युरिक ॲसिडच्या रुग्णांनी पुरेशा प्रमाणात पाणी प्यावे. यामुळे मूत्रपिंड स्वच्छ राहण्यास आणि मूत्रमार्गे युरिक ॲसिड बाहेर टाकण्यास मदत होते. त्यामुळे या लोकांनी दररोज किमान ८ ते १० ग्लास पाणी प्यावे.

## पाककला

### गव्हाचे कुरकुरे

**साहित्य :** १ कप गव्हाचे पीठ किंवा मैदा, १ टेबलस्पून कसूरी मेथी, १/२ टीस्पून जीरे, १ टीस्पून ओवा, १/४ टीस्पून हळद, चवीप्रमाणे मीठ, २ टेबलस्पून तेल, तेल,

**कृती :** एका बाऊलमध्ये गव्हाचे पीठ घेणे. त्यात सर्व मसाले घालून मिक्स करून घेणे. ओवा व कसुरी मेथी हातावर कुस्करून घालणे. म्हणजे त्याचा स्वाद छान लागतो. सर्व व्यवस्थित मिक्स करून झाल्यावरती तेल घालून सर्व पिठाला व्यवस्थित चोळून घेणे.पिठाची मूठ तयार झाली पाहिजे. थोडे-थोडे पाणी घालून चपातीला कणिक मळतो, त्यापेक्षा थोडीशी घट्ट कणिक मळून घेणे. गॅसवर कढईत तेल घालून, तापत ठेवावी. पीठ एकदा व्यवस्थित मळून घतेल व त्याचे तीन उंडे तयार करून घ्यावे. किचन मधील कात्री घेऊन, हव्या त्या आकाराचे छोटे-छोटे तुकडे कात्रीने करून घ्या. तेल तापल्यानंतर गॅस मध्यम आचेवर ठेवावा. कढईत जेवढे बसतील, तेवढे कुरकुरे घालून घेणे. सतत हलवत राहणे दोन्ही बाजूंनी छान लाल झाली ते काढून घ्यावे अशा प्रकारे सर्व कुरकुरीत तळून घेणे.

## वास्तू

### दारामागे कपडे ठेवू नये

दाराच्या मागे कपडे लटकवणे शुभ मानले जात नाही आणि त्यामुळे वास्तुदोष होऊ शकतो. वास्तुशास्त्रानुसार घराचा प्रत्येक दरवाजा हा सकारात्मक उर्जेच्या प्रवेशाचा आणि नकारात्मक उर्जेच्या बाहेर जाण्याचा मुख्य मार्ग आहे. जेव्हा कपडे दाराच्या मागे टांगले जातात तेव्हा ते उर्जेच्या प्रवाहात अडथळा आणते. परिणामी घरात अशांतताआणि आर्थिक समस्या वाढू शकतात.

## सल्ला

डोळ्यांभोवतीची काळी वर्तुळे घालविण्यासाठी कोल्ड कॉम्प्रेस ते डोळ्यांभोवतीच्या त्वचेवर १०-१५ मिनिटे ठेवा आणि नंतर ते काढून टाका.

## सौंदर्य

✲ रिकामा पोटी १ टोमॅटो खाल्ल्याने केस लवकर पांढरे होत नाहीत.

✲ रिकाम्या पोटी ताक प्यायल्याने पोटदुखी बरी होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, पू.षा.१५।४५, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील. मानसिक स्थिती आनंददायक राहील. कार्यात विलंब झाला तरी यश मिळेल.

**वृषभ :** वैवाहिक जीवनात सुख मिळेल. आनंदाची बातमी मिळेल. निरुपयोगी गोष्टींकडे लक्ष देऊ नका. देवाण-घेवाण काळजीपूर्वक करा.

**मिथुन :** मागील उधारी उसनवारी वसूल होईल. शुभ वार्ता देखील मिळतील. एखादे कार्य झाल्यामुळे आनंदाचा अनुभव येईल.

**कर्क :** मित्रांचा सहयोग मिळेल. आरोग्य नरम-गरम राहील. खाण्या-पिण्याविषयीची पथ्य पाळावी लागतील. आरोग्य देखील उत्तम राहील. कौटुंबिक सहयोग मिळेल.

**सिंह :** आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळा. नोकरदारांनी इतर व्यक्तींची मदत घेऊन कामे करावी. बेपर्वाईने वागु नका.

**कन्या :** आर्थिक विषयांमध्ये स्थिती चांगली राहील. स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. कार्यालयामध्ये सहकार्य मिळेल. व्यापार व्यवसायात आशादायक परिणाम मिळतील.

**तूळ :** सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल. आपणास समाधानकारक स्थिती मिळेल.

**वृश्चिक :** पैशासंबंधी स्थिती ठीक राहिल. इच्छित विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये वरिष्ठांचा सल्ला घेऊन पाउल टाका.

**धनु :** मोठ्यांचा सल्ला घ्या. आरोग्य चांगले राहील. एखाद्या जुन्या मित्राशी भेट होईल. आरोग्याच्या दृष्टीने ही वेळ उत्तम आहे.


**मकर :** मित्रांचा पाठिंबा मिळेल. भावनात्मकतेमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील.

**कुंभ :** जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळा. आर्थिक स्थितीत हळू-हळू सुधार होईल.

**मीन :** कौटुंबिक विषयांमध्ये आशादायक काळ आला आहे. खर्च अधिक होईल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. संभाषणात सावधगिरी बाळगावी लागेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२८९ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२८८ चे उत्तर



**आडवे शब्द :** १) विश्व; जगत; दुनिया ३) पुरुषाचे एक वस्त्र; विजार; तुमान ६) पंज्याचा सांधा; मणिबंध ८) नहाणी; स्नानगृह; अंघोळीची जागा १०) आठवड्यातील कोणताही दिवस; घाव ११) आसपास; परिसरात १३) हमेशा; नेहमी १४) मृत्यू; देहावसान १५) सुंदर (पुरुष) १७) जखम वगैरेचा शरीरावर राहणारा डाग १९) बऱ्याच काळापासून मनात राहिलेले दुःख; शल्य २०) भावासंबंधी; भावाच्या नात्यातील २२) मुलीची किंवा मुलाची मुलगी २३) जाड; फुगीर; मोठा गोल

**उभे शब्द :** १) अनेक वस्तू एकत्र करणे; जमविणे २) भक्त किंवा सेवक यांचा समूह ३) बसण्यासाठीचे एक लाकडी साधन; कालवा ४) विष; गरळ ५) आईचा भाऊ; मातुल ७) गवळ्याची बायको ९) निवडणुकीतील मुख्य प्रक्रिया १०) पिलू; पाडस; लेकरू १२) एक प्रकारचे साधे जेवण १३) प्रश्न १६) पसरलेले; विस्तृत १८) विधिज्ञ; ॲडव्होकेट; कायदेपंडित २१) काळा नव्हे तो; गौरवर्णीय; उजळ रंगाचा

# ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲ मुलांचे विश्व ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** प्रत्येकाच्या मनात जागा करणे गरजेचे नसते काहींच्या डोळ्यात खटकण्यात पण वेगळीच मजा असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'लॉयर' आणि 'ॲडव्होकेट' यात काय फरक आहे?

पूर्वीच्या काळात कायद्याची पदवी असलेल्या व्यक्तींकडे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या दिल्या जात ! १९ वे शतक पाहिलेत तर ब्रिटिश साम्राज्य अनेक पारतंत्र्यात असलेल्या देशांसाठी अनेक कायदे बनवत होते, त्याचवेळेला न्यायालयात खटला चालू असताना वकील सुद्धा काम बघत होते ! मग यावरून तीन वेगवेगळे नावे पुढे आलीत

ज्याने कायद्याचा अभ्यास केलेला आहे, कायद्याची पदवी घेतलेली आहे, आणि ब्रिटिश शासनाला ही व्यक्ती कायदे बनवण्यात मदत करत, आता कायद्याचा अभ्यास असलेली व्यक्ती ह्यासाठी घेत की नवीन कायद्याच्या काही तरतुदी न्यायाच्या कक्षेत बसतात का ? एखादी अशी तरतूद तर नाही जी पूर्वी बनवलेल्या कायद्याशी विसंगत असेल (an act of law making), जेणेकरून बनवले जाणारे कायदे कमीत कमी सदोष असतील ! या व्यक्तींना लॉयर म्हणत !

दोन पक्षांमधील न्यायालयीन तंट्यामध्ये दोन कायद्याची पदवी घेतलेले लोक अशा पक्षांची बाजू न्यायमूर्तींसमोर मांडत त्यामुळे अशा कायद्याची पदवी घेतलेल्या व्यक्तीला ॲडव्होकेट म्हणत !

ब्रिटिश न्यायालयात वादविवाद मांडण्यासाठी नियुक्त केल्या गेलेल्या व्यक्तीला बॅरिस्टर म्हणत ! कायद्याची पदवी सहित अनेक पास झालेल्या व्यक्तीची नेमणूक बॅरिस्टर म्हणून करत ! बॅरिस्टरचे काम वकिलांपेक्षा मोठे असते ! नुसती केस लढायची नसते तर कायदे हे सुरळीत आहेत का, त्यात काही बदल आवश्यक आहेत का यांसाठी सुद्धा नेमणूक करत ! सरकारला आपले सुझाव देत ! रिसर्च करणे, मार्गदर्शन करणे ही कामे बॅरिस्टरची असत ! हे कधी कधी न्यायाधीशाला सुद्धा मार्गदर्शन करत ! थोडक्यात समजून घ्या, कायद्याचा प्रोफेसर, जो dvocate सुद्धा आहे, Lawyer सुद्धा आहे !

कायदा बनवण्याचे काम Lawyer ने केले, ह्या कायद्याशी संबंधित तंट्यामध्ये ॲडव्होकेटने आपापल्या पक्षाची बाजू कोर्टात मांडली, बॅरिस्टर ने dvocate ला मार्गदर्शन केले, ह्या कायद्यात बदल असल्यास ते संसदेला कळवले, आणि आपले सुझाव दिलेत, ह्या सूचनांवर त्यांनी समिति / लवादासमोर वादविवाद केलेत ! नंतर पुन्हा पुढचे काम Lawyer कडे आले ! आज रोजी ह्या तिघांना भारतात कोणत्याही एका नावाने संबोधतात ! ह्या क्षेत्रांमधून आता specialization एवढे आवश्यक उरलेले नाही ! आणि प्रत्येक गोष्टीला specific बनवणारी ब्रिटिश मानसिकता सुद्धा राहिली नाही !

### एका दगडाची किंमत

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक हिरा व्यापारी होता जो हिऱ्यांचा एक महान तज्ञ मानला जात असे, परंतु एका गंभीर आजारामुळे त्याचे निधन झाले. त्याला पत्नी आणि एक मुलगा होता. मुलगा मोठा झाल्यावर त्याची आई म्हणाली- बेटा, मरण्यापूर्वी तुझ्या वडिलांनी हा दगड सोडला होता, तू तो बाजारात घेऊन जा आणि त्याची किंमत जाणून घे, लक्षात ठेव तुला फक्त किंमत शोधायची आहे, तो विकायचा नाही.


मुलगा दगड घेऊन बाहेर पडला, सर्वप्रथम त्याला भाजीपाला विकणारी एक महिला भेटली. अम्मा, या दगडाच्या बदल्यात तू मला काय देऊ शकतेस?, त्या तरुणाने विचारले. जर तुम्हाला द्यायचेच असेल मी दोन गाजरांच्या बदल्यात देईल... ते वजन करण्यासाठी उपयुक्त ठरेल. भाजी विक्रेता महिला म्हणाली.

तरुण पुढे सरकला. यावेळी तो एका दुकानदाराकडे गेला आणि त्याच्याकडून दगडाची किंमत जाणून घेऊ इच्छित होता. दुकानदार म्हणाला- याच्या बदल्यात, मी जास्तीत जास्त ५०० रुपये देऊ शकतो. जर तुम्हाला द्यायचे असेल तर द्या, नाहीतर पुढे जा.

यावेळी तो तरुण एका सोनारकडे गेला. सोनाराने दगडासाठी २० हजार रुपये देईल असे सांगितले.

मग तो एका प्रतिष्ठित हिऱ्याच्या दुकानात गेला जिथे त्याला दगडासाठी १ लाख रुपयांची ऑफर मिळाली आणि शेवटी तो तरुण शहरातील सर्वात मोठ्या हिऱ्या तज्ञाकडे गेला आणि म्हणाला, कृपया मला या दगडाची किंमत सांगा. तज्ञाने दगडाची काळजीपूर्वक तपासणी केली आणि तरुणाकडे आश्चर्याने पाहत म्हणाला, हा एक अमूल्य हिरा आहे, कोट्यवधी रुपये देऊनही असा हिरा मिळणे कठीण आहे.

तात्पर्य : जीवन हे देखील हिऱ्याप्रमाणे अमूल्य आहे आपण ते वाया घालवू नये तर त्याचे मूल्य ओळखावे.



## जीवन का अमृत (भाग १)

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

मुझे खुशी है कि आप प्रेम और भक्ति से भजन सिमरन कर रहें हैं, जिसके फलस्वरूप आपको सत्गुरु की दया का आशीर्वाद मिला है १ आपको सत्गुरु की कृपा से जीते जी मरने का अनुभव मिला है और सौभाग्य से आप इस ऊँचे सत्य के गवाह हैं। अनेकों प्रकार के आशीर्वादों के प्रति आपकी कृतज्ञता स्मरणीय हैं; इससे आपको और अधिक आंतरिक शांति तथा सही समझ की भेंट मिलेगी ।

प्रभु के सच्चे जिज्ञासु पर किसी प्रकार की कोई बंदिश नहीं होनी चाहिए। स्वाभाविक प्रतिक्रिया अंतर से आती है। प्रश्न यह है कि बाहर से कैसे हटा जाए, ताकि अंतर में उच्चतर किस्म का अनुभव मिल सके। सत्य की खोज की चाहत हर इंसान के अंदर विद्यमान है और वह तब तक संतुष्ट नहीं हो सकता या सकती, जब तक जिंदगी की गुत्थी को स्वयं ना सुलझा लें । यहाँ पर भूखों के लिए भोजन है और प्यासों के लिए पानी है। ऊपर बैठा प्रभु हमारे विचारों को देखता है, हमारी इच्छाएँ जानता है और उनके अनुसार इंतजाम करता है।

एक बार जिंदगी के रहस्य का सवाल हमारे जीवन में आ जाए, तो उसका समाधान किसी ना किसी समय अवश्य मिलेगा। जो कुछ मैंने अपने सत्गुरु के चरण-कमलों में सीखा है, सत्य के जिज्ञासु उससे अवश्य ही लाभान्वित होंगे, यदि वे इसका अनुसरण करें ।

ध्यान-अभ्यास ५१ - संगीत में आकर्षित करने की लाजवाब शक्ति है। अंदाजा लगाइये कि अंतर का दिव्य संगीत कितना शक्तिशाली और खींचने वाला होगा ! यदि हम प्रभु से अपनी आत्म का मिलाप कराना चाहें, तो आंतरिक संगीत हमें वहाँ तक ले जाएगा।

मैने आपके कुंडलिनी के अनुभव के बारे में पढ़ा, जो आपकी जानकारी के बिना ही जागृत हो गई थी और पाँच पवित्र एवं सिद्ध नामों के जाप से तथा अपनी इच्छा शक्ति की सहायता से, आप इसके असर से बचने में सफल रहे ।

सिद्ध नामों का जाप करते रहना, हमेशा अच्छा रहता है, जो कि किसी भी बाहरी दुर्घटना से हमारी रक्षा करता है । आप इस सर्पिल (कुंडलिनी) शक्ति को जागृत करने के बारे में न सोचें, क्योंकि ऐसा करना खतरे से खाली नहीं है। विस्तृत जानकारी के लिए आप कृपया योग: एक तुलनात्मक अध्ययन नामक पुस्तक को देखें, जहाँ यह विषय दीक्षितों के फायदे के लिए, सावधानी से समझाया गया है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

थी उसकी फोटो ली गयी तो उसमें उस के प्रेमी का फोटो आ गया। अगर आप मन में किसी को फल देते हैं तो सच में मन में आप के संकल्पों से फूल बन जायेगा और करीलियन कैमरे में ये दिखेगा और उस व्यक्ति को ऐसा ही सकून मिलेगा जैसे वास्तविक रूप में फूल देने पर होता है। अगर आप किसी की मन में आरती उतारते हैं तो आप के संकल्पों में सचमुच थाली और अगरबत्ती बन जायेगी और उस व्यक्ति को ऐसे ही महसूस होगा जैसे सची सची में उसकी आरती उतार रहे हैं। अगर आप किसी से मन में प्यार करते हैं तो आप के संकल्पों में गुलाब का फूल बन जायेगा और उससे सेंट या चंदन जैसी सुगंध निकलेगी जो वातावरण में फैलेगी और उस व्यक्ति को भी पहुंचेगी तभी कहते हैं प्यार कभी छुपता नहीं, सभी को पता चल जाता है। मां बाप को तुरंत पता चल जाता है जब उनके बच्चे किसी ऐसे रास्ते पर चलते हैं। जब भगवान से प्यार करते हैं तो मन में ऐसे फूल बनने लगते हैं जिनसे अदूतीय सुगंध पैदा होती है जिस से सभी जीव जन्तु और व्यक्ति आकर्षित होते हैं। उन्हे बहुत अच्छा लगता है। सभी की मनोभावना बदलने लगती है। जब हम शांति के संकल्प करते हैं तो हमारे मन से सफेद सफेद फूल निकलने लगते हैं जो लोगो से टकराते हैं और उन्हें ऐसी खुशबू मिलती है जिस से उन्हे शांति महसूस होती है। उन्हे विश्वास हो जाता है कि अब आप से उन्हे कोई खतरा नहीं है। इसलिये युद्ध विराम के लिये सेना सफेद झंडा एक दूसरे को दिखाती है। जब हम किसी को शाबास देते हैं तब हमारे मन से निकले संकल्प हाथ का रुप धारण कर लेते हैं जो उनके सिर व पीठ पर सहलाने का अनुभव कराते हैं और बहुत अच्छा अनुभव करने लगते हैं। इस के इलावा उस समय जिस चीज का सोच रहे हैं जैसे फूल डाल रहे हैं या कुछ इनाम देने का सोच रहे हैं तो मन में उसी वस्तु की आकृति बन जायेगी। सहयोग देने का जब संकल्प करते हैं तो मन में एक दूसरे के साथ शेक हैण्ड की आकृति बन जायेगी। किसी को धन देने का सोचते हैं तो संकल्पों में आप धन देते हुये दिखेंगें। अगर गाड़ी देना चाह रहे हैं तो संकल्पों में गाड़ी बन जायेगी और उसकी चाबी देते हुये दिखेंगें। जब हम दया भाव रखते हैं तो हमारे मन में बने फूलों से ऐसी सुगंध निकलती है जो लोगो में दया करने के विचार चलने लगते हैं। गहन साधना में हमारे संकल्पों से छोटे छोटे फूल या सैंट के कणों की बरसात सी वातावरण में होने लगती है, जिसकी खुशबू से शांति फैलती है और लोग वैर भाव भूल जाते हैं। उपरोक्त वर्णित आकृतियों या इनसे मिलती जुलती आकृतियां मन अपने आप अलग अलग परिस्थियों में बना लेता है। हां ये पक्का है आकृति या रेखाएं संकल्पों से बनती हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**मास्तर :** सांगा शुन्यापेक्षा लहान संख्या कोणती आहे?

**पिंटू :** आहे ना **मास्तर :** कोणती आहे?

**पिंटू :** टिंब

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✲ ऑलिम्पिक स्पर्धांची सुरुवात कोठे व कधी झाली?

- १८९६ मध्ये अथेन्स (ग्रीक)

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### बौद्धिक विकास कसा करावा?

**१. गर्भधारणेपूर्वी घ्यावयाची काळजी :** बाळ सुदृढ, हशार व बुद्धिमान होण्यासाठी गर्भधारणेपूर्वीपासूनच काळजी घेणे आवश्यक आहे. आपल्या घरी अचानक आलेल्या पाहुण्यांचे आदरातिथ्य व्यवस्थित करता येत नाही; परंतु हेच पाहुणे येणार हे आधीच काही दिवस माहीत असेल, तर त्यांचे आदरातिथ्य आनंदाने व्यवस्थित करता येते. तसेच आपल्या घरी कायमस्वरूपी येणारा छोटासा पाहुणा म्हणजेच बाळ हे जर नियोजनपूर्वक घरी आणले, तर त्याची शारीरिक, मानसिक व बौद्धिक क्षमता नक्कीच वाढवू शकतो. गर्भधारणेपूर्वी दोघा पती-पत्नींची आरोग्य तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून करून घ्यावी. तसेच दोघांच्याही रक्त, लघवीच्या तपासण्या करणे आवश्यक आहे. रक्ताचे प्रमाण कमी असेल, तर गर्भधारणेपूर्वीच त्यावर उपचार करावेत.

तपासण्यांमधून जर काही शारीरिक व्याधी लक्षात आल्या तर सुरुवातीला त्यावर उपचार करून घेणे आवश्यक आहे.

**पंचकर्माद्वारे शरीरशुद्धी -** बीज जर शुद्ध असेल, तर 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' म्हणजे त्यातन निर्माण होणारे मूल देखील तेजस्वी, आरोग्यपूर्ण संस्कारक्षम व बुद्धिमान जन्माला येते. भावी माता-पित्यांनी स्त्रीबीज व पुरुषबीज शुद्धी करण्यासाठी पंचकर्म करून घ्यावे. आपल्या कुटुंबामध्ये वंशपरंपरागत जे आजार असतात, ते आजार आपल्या बाळामध्ये येण्याचे प्रमाण नक्कीच कमी होते. यासोबत ओंकार, ध्यानधारणा, प्राणायाम, सात्त्विक आहार-विहार जर ठेवला तर नक्कीच तुमचे बाळ डॉक्टर, इंजिनीअर, संशोधक होईलच. पण त्याही पलीकडे जाऊन जगातील उच्च स्थान प्राप्त करेल.

**गर्भधान संस्कार -** मासिक पाळीच्या दहाव्या दिवसापासून ते अठराव्या दिवसापर्यंत गर्भधान विधी करतात. शुभदिनी सायंकाळी भावी माता-पित्याने स्नान करून कुलदेवतेचे स्मरण करून अपत्यप्राप्तीची इच्छा मनात धरून रात्री

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# समाजकारण आणि राजकारणातील सिद्धपुरुष



समाजकारणातून राजकारणाकडे आणि राजकारणातून समाजकारणाकडे ही द्विसूत्री अवलंबून लोकाभिमुख कार्य करणारे, आभाळाएवढी उंची असूनही जमिनीवर घट्ट पाय रोवून लोकांमध्येच रमणारे अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकारणातील दिग्गज व्यक्तिमत्व म्हणजे स्व. आ. शिवाजीराव कर्डिले, पन्नास टक्के समाजकारण आणि पन्नास टक्के राजकारण मी करतो, असे ते नेहमी सांगायचे.

सरपंच पदावरुन थेट आमदारकी आणि त्यानंतर राज्यमंत्रीपद असा त्यांचा थक्क करणारा राजकीय प्रवास, दूधवाला 'शिवा' म्हणून त्यांची सुरुवातीची ओळख. नगर शहरात दूधाचा रतिब घालत असताना अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांची ओळख झाली आणि या ओळखीचा फायदा घेत त्यांनी पंचक्रोशीतील अनेक लोकांचे वैयक्तिक आणि सार्वजनिक प्रश्न सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न विनामोबदला केला. त्यामुळे स्वतःच्या बुऱ्हाणनगर गावातून आणि पंचक्रोशीतून जनतेने उचलून धरले. त्यामुळे आपोआपच गावचे सरपंचपद त्यांच्याकडे आले आणि सरपंचपदाच्या बारा वर्षांच्या कालखंडात त्यांनी अनेक लोकांचे संसार उद्ध्वस्त होण्यापासून ते विकास कामांचा धडाका लावला. अशातच १९९५ साली विधानसभेच्या निवडणूक जाहिर झाल्या आणि नगर तालुक्यातून ध्यानीमनी नसलेला उमेदवार देण्यात आला. नगर जिल्हा हा प्रस्थापितांचा जिल्हा, स्व. कर्डिले साहेबांनी तोपर्यंत तालुक्याच्या राजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. विधानसभेसठी नवख्या आणि जनसंपर्क नसलेला उमेदवार दिल्यामुळे साहजिकच तालुक्यातील सर्व विस्थापित गट एकत्र आला आणि त्यांनी स्व. कर्डिलेसाहेबांना उमेदवारीची गळ घातली. जनतेशिवाय अक्षरशः कुठलेही आर्थिक, राजकिय मांडवल किंवा वारसा नव्हता. परंतु लोकांनी वर्गणी जमा करून त्यांना निवडणूक लढविण्यास भाग पाडले. त्यावेळी जिल्ह्यातील काही प्रस्थापित नेत्यांचेही त्यांना अनपेक्षितरित्या अप्रत्यक्ष सहकार्य मिळाले. कुणाच्याही मागमूलाला नसताना मनी पावर आणि मसल पावर नसताना ते अपक्ष म्हणून निवडणूक लढले आणि जिंकले सुद्धा ! दूधवाला शिवाचा – शिवाजीराव आणि शिवाजीरावचे – कर्डिले साहेब झाले. नगरजिल्ह्याच्या राजकारणात विस्थापितांचे नेते म्हणून नवे पर्व सुरु झाले !

२०१९ ते २०२४ चा काळ वगळता गेल्या २६ वर्षाच्या कालखंडात ते नगर, नेवासा, पाथर्डी आणि राहुरी या तालुक्यांचे आमदार म्हणून काम पाहत होते. लोकांचा प्रतिनिधी आणि मोबाईल आमदार म्हणून ते ओळखले जायचे, जनतेशी कायम संपर्कात राहने आणि तळागाळातील लोकांमध्ये मिसळून त्यांचे प्रश्न ते अगदी कौटुंबिक पातळीवर चर्चा करुन सोडवायचे. प्रत्येक विवाह समारंभ, अंत्यविधी, दशक्रियाविधी, घरगुती कार्यक्रमात न चुकता हजेरी लावायचे, त्यामुळे त्यांना जनमानान्यांशी नळ बांधणे अगदी सोपे होऊन बसले. एखाद्या आमदाराने दशक्रिया विधी किंवा तत्सम कार्यक्रमाला हजेरी लावणे हे लोकांना नव्यानेच होते. तसेच दरवर्षी दिवाळीचा फराळ सर्वसामान्य जनतेसाठी आयोजित करणे या दोन्ही गोष्टींचा नगर जिल्ह्यात नवे महाराष्ट्रात पायंडा पाडणारे स्व. कर्डिले साहेब हे जनक म्हटल्यास वावगे ठरु नये. १९९५ ते २०२५ दरम्यानच्या काळात अनेक राजकिय आणि मतदारसंघ स्थित्यंतरे त्यांनी अनुभवली. ज्यापैकी काही स्थित्यंतरे त्यांना राजकारणातून संपविण्यासाठी घडवून आणली. जसे की, नगर तालुका मतदारसंघाची विभागणी. परंतु कर्डिले साहेब सर्वांना पुरुन उरले, खोटे गुन्हे नोंदवून, फेक नेरेटिव्ह सेट करुन त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न सुध्दा केला गेला. परंतु स्वतःशी आणि जनतेशी असलेला प्रामाणिक विश्वास आणि परमेश्वरावरची अढळ श्रद्धा आणि वेळप्रसंगी साम, दाम, दंड, भेद नितीचा बापर करुन त्यांनी धैर्याने तोंड दिले. अध्यात्याच्या असलेल्या आवडीतून त्यांनी संत–महंतांना दरवर्षी स्वतःच्या घरी बोलावून त्यांचा यथोचित आदर केला. सन २००२ ते राज्यमंत्री होण्याअगोदर युती सरकारच्या काळामध्ये ज्यावेळेस ४० अपक्ष आमदारांनी सरकार स्थापनेसाठी पाठिंबा दिला त्यात कर्डिले साहेब होते. त्याचवेळेस त्यांना मंत्रीपदाची संधी चालूनआली होती, परंतू त्यांनी ती नाकारून नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, घोसपुरी पाणीपुरवठा योजना आणि नेवासा तालुक्यातील खेडले परमानंद पाणीपुरवठा योजना आणि शनिशिंगणापूर पाणीपुरवठा योजना, वांबोरी चारी आदी योजना मंजुर करुन घेऊन त्या मार्गी लावायचे काम केले. नंतर ती कामे पुन्हा राबवली. नगर तालुक्यातील पाण्याचा अत्यंत ज्वलंत प्रश्न त्यांनी साकळाई योजनेमार्फत मंत्रीपद पदाला लावून सोडविण्याचा प्रयत्न केला. मध्यंतरीच्या काळात तत्कालीन ग्रामविकास आणि पाणीपुरवठामंत्री आबा तथा आर. आर. पाटील यांनी त्यांना राष्ट्रवादीत काँग्रेस पक्षात येण्याचा आग्रह धरुन ती रखडलेली सर्व कामे विकासकामे मार्गी लावण्याचे आश्वासन देऊन ती वचनपुर्तता केली आणि दोनही तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रलंबित प्रश्न सुटला. स्व. कर्डिले साहेबांचे शिक्षण फारसे नसले तरी व्यावहारिक जाण, हजरजबाबीपणा आणि विकासाची दूरदृष्टी त्यांन होती.

नगर, नेवासा, राहुरी, पाथर्डी तालुक्यात गेल्या २६ वर्षात त्यांनी अनेकानेक विकासकामे केली, त्यात शिक्षण, आरोग्य, पाणी, रस्ते, वीज, समाजमंदिरे अशा सार्वजनिक कामांचा विशेष उल्लेख करता येईल. हे सर्व करत असताना त्यांनी आपल्या स्वतःच्या गावाकडेही दुर्लक्ष होऊ दिले नाही. पाणी, रस्ते आणि वीज या मुलभूत सुविधांकडे लक्ष देतानाच आपल्या गावातील मुले / मुली हे दुसरीकडे शिक्षणासाठी जातात आणि विशेषतः मुलींचे शिक्षण दहावीनंतर थांबते, हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी बु ऱ्हाणनगरला श्री बाणेश्वर शिक्षणसंस्था स्थापन करुन इयत्ता पाचवी ते बारावी, हायस्कूलपर्यंत तसेच कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, डी. एड., बी.एड. महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्था स्थापन करुन मुलभूत सुविधांसह जब दर्जाचे शिक्षण उपलब्ध करुन दिले त्यामुळे मतदारसंघ आणि शहरातील विद्यार्थ्यांचा कल बुऱ्हाणनगरकडे वळाला. त्याचबरोबर ते स्वतः उत्तम आणि नामांकित कुस्तीपटू असल्यामुळे क्रीडाखात्याच्या धोरणानुसार त्यांनी मैदाने चांगल्या दर्जाची बनवून तालुका क्रीडा संकुले उभारण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.

जुलै २००२ मध्ये स्व. कर्डिले साहेबांना पुन्हा मंत्रीपदाची संधी चालून आली तोपर्यंत त्यांनी सर्व महत्वाच्या पाणी योजना, इतर महत्वाची विकासकामे मार्गी लावली होती. त्यांनी ही संधी स्विकारली आणि त्यांना मत्स्य आणि बंदरे विभागाचे राज्यमंत्रीपद मिळाले. माझ्या कामाचा आवाका त्यांना माहित असल्याने मलाही त्यांनी स्वीय सहाय्यक पदावर प्रतिनियुक्तीवर मंत्रालयात काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली. तसा मी देखील साहेबांबरोबर ते सरपंच पदावर असण्याच्या अगोदरपासूनच काम करीत होतो त्यामुळे जनतेची कामे, प्रश्न कसे सोडवावीत, साहेबांना काय अपेक्षित आहे/ नाही याचे भान ठेवूनब काम करायला सुरुवात केली, त्यानंतर मत्स्य आणि बंदरे विभागाध्यतिरिक्त साहेबांकडे जलसंधारण आणि वने महिला व बालविकास, भुकंप पुनर्वसन आदि मदत कार्य तसेच ते नगरचे पालकमंत्री सुद्धा झाले, खात्यांव्यतिरिक्त पालकमंत्रीपदाचा भार यामुळे त्यांनी जिल्ह्याच्या विकासकामांचा डोंगर उभा केला. विधीमंडळात त्यांनी अतिशय जबाबदारीने आणि सक्षमपणे काम केल्याचे मला पहायला मिळाले. त्याकाळात मच्छिमारांचे अनुदान, बोटी विषयक प्रश्न असे अनेक प्रश्न प्रलंबित होते परंतू साहेबांनी हे सर्व प्रश्न सोडविण्यात प्रादेशिक विभागाचा विचारात पुढाकार घेतला. अनेक मच्छिमार संघटनांचे प्रतिनिधी हे बहुतांश कोकणातील होते. परंतु त्यांनी अप्रत्यक्षरित्या त्यांची त्यांचा 'कोकणाचा नेता' अशी ओळख निर्माण केली होती. त्यांच्याबरोबर गाडीत प्रवास करण्याचा अनेकदा योग आला, नगर ते मुंबई किया मुंबई ते नगर येत असतांना ते कुठल्याही हॉटेलमध्ये न थांबता सोबत असलेला जेवणाचा डबा खात असत, वेळेचे बंधन आणि स्वतःच्या तब्बेतीकडे ते जाणीवपूर्वक लक्ष द्यायचे. मतदारसंघातील लोकांना, सामान्यतः कुठल्याही सार्वजनिक विकासकामांच्या तक्रारी करण्याची संधी देत नसत. प्रवासात एखादा रस्ता खराब दिसला की सदरच्या गावातील लोक येण्यापूर्वीच त्या रस्त्याच्या कामाचे मंजूरीपत्र ते दाखवायचे, असे कितीतरी प्रसंग सांगता येतील. आर. आर. पाटीलांचे स्व. साहेबांवर विशेष प्रेम होते, पाठपुराव्याच्या कामानिमित्ताने मी आर. आर. पाटलांकडे सातत्याने जायचो. तेव्हा ते मांडीवर थाप मारून आणि मिशीवर साव देऊन हाताने मला खुणवायचे की 'तुमचा पहिलवान कोठे आहे ?' हे मी जेव्हा कर्डिले साहेबांना सांगायचो तेव्हा त्यांनाहसू आवरत नसे. मंत्रीपदाच्या काळात नगर तालुक्यात दुष्काळ पडला. त्यावेळेस सरकारने दुष्काळी तालुक्यात जनावरांच्या छावण्या उभारण्याचा निर्णय घेतला. कर्डिले साहेबांनी तालुक्यात विक्रमी छावण्या उभारुन दुष्काळाची झळ सर्वसामान्य शेतकऱ्यांना जाणवू दिली नाही. त्यावेळेस या छावण्यांची राज्यभर चर्चा होऊन 'रोल मॉडेल छावणी' म्हणून सरकारने अधोरेखित केले होते. 'जनतेचा पैसा जनतेसाठीच' हे ब्रीदवाक्य घेऊन सरकारकडून आलेला निधीचा एक रुपयाही परत न जाता तो विकासकामासाठीच वापरला जाईल, याची जाणिवपूर्वक काळजी ते घेत असत. माणसे ओळखण्यात ते अतिशय तरबेज होते. जनता दरबारात आलेला एखादा व्यक्ती कोपऱ्यात जरी बसलेला असेल तर तो वैयक्तिक काम घेऊन आला आहे का किंवा सार्वजनिक काम घेऊन आला आहे हे ते सहजरित्या ओळखायचे, त्यामुळे ते कायम म्हणायचे की, ज्योतिषी हात पाहून भविष्य सांगतात परंतु मी चेहरा पाहून सांगतो. वेळोवेळी महत्वाच्या विषयांवर मला बोलावून घेऊन किंवा दुरध्वनीद्वारे ते चर्चा करीत असत, हे मला अभिमानाने नमुद करावेसे वाटते, २००७ पासून ते आजतागायत ते अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेवर संचालक आणि दोनदा चेअरमन पदावर काम करीत असताना जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या अनेक योजना राबविल्या आणि यशस्वीपणे अंमलात आणल्या. असो.

आज स्व. कर्डिलेसाहेब आपल्यात नाही ही वस्तुस्थिती आहे. कर्डिले, जगताप, कोतकर, गाहे आणि वाकडे कुटुंबियावर खूप मोठा आघात झालेला आहे. चि. अक्षय, सुवर्णा, शितल, ज्योती, कोमल आणि त्यांच्या सुशिल पत्नी अलकाताई यांच्यावर कोसळलेली हानी कधीही भरुन निघणारी नाही. चि. अक्षय याने तरुणवर्गाचे मोठे संघटन करून तरुणांची फळी उभारली आहे. युवानेतृत्व अक्षय हा राजकारणाचे आडाखे बांधण्यात साहेबांच्या तालमीत तरबेज झाला असून स्व. कर्डिले साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवून समाजकारण आणि राजकारण करणे अपेक्षित आहे. सुदैवाने जगताप, कोतकर, गाडे या कुटुंबियांव्यतिरिक्त मा. खा. सुजितदादा विखे पा, यांचे भक्कम पाठबळ आहेच!

स्व. कर्डिले साहेबांना विनम्र अभिवादन !

**– प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे, बुऱ्हाणनगर**

# रोबोटिक गुडघा व हिप रिप्लेसमेंट सर्जरीला 'साईदीप सहयाद्री हॉस्पिटल'मध्ये सुरुवात

## डॉ.व्ही.एन. देशपांडे यांचे सिंगापूर येथे यशस्वी प्रशिक्षण



नगर – साईदीप सहयाद्री हॉस्पिटल मध्ये गुडघा व खुब्याचे रिप्लेसमेंट साठी स्मिथ अ‍ॅण्ड नेफ्यु या जगविख्यात कंपनीचा रोबोट कार्यरत झाला आहे. अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. व्हि.एन. देशपांडे यांनी १० पेक्षा जास्त गुडघ्याच्या व खुब्याच्या रोबोटिक शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण केल्या असून त्यांनी सिंगापूर येथे 'स्मिथ अ‍ॅण्ड नेफ्यू' कंपनीच्या प्रशिक्षण केंद्रात रोबोटिक नी (गुडघा) आणि हिप (खुबा) रिप्लेसमेंट शस्त्रक्रियांसाठी एक आठवड्याचे विशेष प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

हॉस्पिटल मधील अस्थिरोग विभागात अत्याधुनिक रोबोटिक शस्त्रक्रिया करण्यास सुरवात झाली आहे. डॉ व्ही. एन. देशपांडे यांनी सिंगापूर येथे प्रशिक्षण पूर्ण केले असून त्यांचे 'मास्टर लेव्हल ट्रेनिंग पूर्ण झाले आहे. या प्रशिक्षणात संपूर्ण भारतातून निवडल्या गेलेल्या १६ डॉक्टरांपैकी डॉ. देशपांडे हे एक होते. १७ वर्षांच्या अनुभवावर आधारित या प्रशिक्षणामध्ये, त्यांना रोबोटिक्स, व्हर्च्युअल प्लॅनिंग, कॅडेवर आणि प्रत्यक्ष रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्याचा सराव मिळाला. यापूर्वी त्यांनी बंगळूर, पुणे आणि मुंबई येथेही रोबोटिक्सचे प्रशिक्षण घेतले आहे.

या शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणारा 'कोरी' हा 'स्मिथ अ‍ॅण्ड नेफ्यू' कंपनीचा अत्याधुनिक रोबो आहे.

**कोरी रोबोची कार्यपद्धती...** कोरी (CORI) रोबो 'सर्फेस मॅपिंग टेक्नॉलॉजी' वापरून हाडांचे ३डी मॉडेल तयार करतो. या तंत्रज्ञानामुळे, इम्प्लांटचा आकार आणि हाडांचा आकार अचूकपणे जुळवून, इम्प्लांट १ मिमी आणि १ अंशाच्या अचूकतेने बसवले जाते. या रोबोटिक शस्त्रक्रियांमुळे रुग्णांना अनेक फायदे होतात, ज्यात लवकर रिकव्हरी, कमी वेदना, कमी फिजिओथेरपी आणि कमी खर्च यांचा समावेश आहे. या तंत्रज्ञानामुळे गुडघ्याचे इम्प्लांट योग्यरित्या बसवले जाते, ज्यामुळे सांधा अधिक काळ टिकतो.

डॉ. अभिजित आगाशे, डॉ. अभिजित नालकर, डॉ. प्रवीण गायकवाड ऑर्थो सर्जन यांची टीम हाडांच्या व गुडघ्याच्या आणि खुब्याच्या विविध शस्त्रक्रिया करतात व हाडांच्या इतर व्याधींवर उपचार करतात.




## साधना कुकडे – कुलकर्णी यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी पुरस्कार प्रदान

महात्मा गांधी जयंती निमित्त करडे स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमी, रायगड २०२५ ठाणे येथे (मराठी ग्रंथ संग्रहालय) राष्ट्रपिता महात्मा गांधी पुरस्कार आनंदवनभुवन पूर्व प्राथमिक बालवाडी विभागाच्या शिक्षिका सौ.साधना प्रसाद कुकडे – कुलकर्णी यांना गायक (बिग बॉस) संतोष चौधरी, ज्येष्ठ अभिनेते जयराज नायर, सिने अभिनेते झाकीर खान, (महाराष्ट्र शासन) संचालक, समृध्दी प्रकाशन, युवक पुरस्कार खरात या सर्वांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# आपुलकीच्या दिव्यांनी उजळली वृद्धाश्रमातील दिवाळी

## युवा एकसाथ फाउंडेशनचा उपक्रम; आजी–आजोबांना दिवाळी भेट

नगर – युवा एकसाथ फाउंडेशनने विळदघाट येथील मातोश्री वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांसह दिवाळी साजरी केली. वृद्धाश्रमातील आजी–आजोबांना आपुलकीने दिवाळी भेट देऊन, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले. दिवाळीच्या दिवशी आपल्या कुटुंबासह सण साजरा करण्याची सवय असलेल्या अनेक ज्येष्ठांना आज काही कारणांमुळे वृद्धाश्रमात राहावे लागते. पण या दिवशी जेव्हा हे तरुण त्यांच्याशी प्रेमाने बोलले, गप्पा मारल्या, भेटवस्तू दिल्या, तेव्हा अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. आपल्या कुटुंबातीलच कोणी दिवाळीला भेटायला आले, अशी भावना त्यांच्या मनात दाटून आली.



युवा एकसाथ फाउंडेशनने विळदघाट येथील मातोश्री वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांसह दिवाळी साजरी केली.

यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष रोहित काळोखे, सचिव सुमित भिंगारदिवे, कार्याध्यक्ष प्रिती क्षेत्रे, उपाध्यक्ष संदेश कानडे, राज जाधव, महेश साठे, प्रितेश मोहिते, टेरी वाघमारे, हर्ष शिरसाठ, श्रावणी घोडके, ऋग्वेद घोडके, शार्दुल लोखंडे, वैभव गारुडकर, प्रशांत कनगरे, वैभव गुढेकर आदी उपस्थित होते.

या उपक्रमादरम्यान वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना दैनंदिन वापराच्या वस्तू, फळे, मिठाई वाटण्यात आली. सर्वांनी एकत्र येऊन दिवे लावले, गाणी गायली, आठवणींना उजाळा दिला आणि काही हलकेफुलके खेळही खेळले. या क्षणांनी वृद्धाश्रमातील वातावरणात नवचैतन्य निर्माण केले. दिवाळीचा सण त्यांच्या मनात पुन्हा एकदा उजळला.

रोहित काळोखे म्हणाले, की, दिवाळी म्हणजे फक्त प्रकाशाचा नाही, तर मनामनांतील आपुलकीचा सण आहे. समाजात असे अनेक ज्येष्ठ नागरिक आहेत जे आपल्या कुटुंबापासून दूर राहतात. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणण्यासाठी हा छोटासा प्रयत्न आहे. प्रत्येक तरुणाने अशा कार्यात सहभाग घ्यावा, कारण वृद्धांचे आशीर्वाद हीच खरी संपत्ती आहे. आजच्या तरुणांनी सोशल मीडियावर साजरे होणारे सण थोडे बाजूला ठेवून प्रत्यक्षात कोणाच्या जीवनात प्रकाश नेण्याचे काम करावे, हाच दिवाळीचा खरा अर्थ असल्याचे त्यांनी सांगितले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ३१ ऑक्टोबरला सवलतीच्या दरात जनरल शस्त्रक्रिया शिबीर



नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे ३१ ऑक्टोबर रोजी जनरल शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते २ यावेळेत होणाऱ्या या शिबिरात मोफत तपासणी आणि सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तज्ज्ञ डॉक्टर लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. महेश घुगे, लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. भास्कर जाधव, जनरल सर्जन डॉ. प्रविण मुनोत, डॉ. विवेक भापकर शिबिरात रुग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

शिबिरात पेंडिक्स, हर्निया, हायड्रोसील, मूळव्याध, पित्ताशय काढणे, स्टॅपलर/ लेझर पाईल्स शस्त्रक्रिया, लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया, पोटाचे आजार व शस्त्रक्रिया, गॅस्ट्रो व कोलोनोस्कॉपी, पोटावरील जागेचै बेंबीचे शस्त्रक्रिया व इतर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. हॉस्पिटल मधील अद्ययावत शस्त्रक्रिया विभाग, तज्ज्ञ डॉक्टर, अनुभवी व प्रशिक्षित स्टाफ यामुळे सर्व शस्त्रक्रिया पूर्ण गुणवत्तेच्या केल्या जातात.

हॉस्पिटलमध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनद्वारे सेवा उपलब्ध आहे. डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्ट सह ८०० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपये, एमआरआय २५०० रूपयात उपलब्ध आहे. याशिवाय २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँक सेवाही उपलब्ध आहे. शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. माहितीसाठी संपर्क. : ०२४१–२३२०४७३/७४/७५/७६.



घरापासून दूर असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी घर घर लंगर सेवेच्यावतीने जिल्हा रुग्णालय परिसरात विशेष दिवाळी साजरी करण्यात आली.

# रुग्णालयामधील नातेवाईक आणि रस्त्यावरील वंचितांची दिवाळी घरघर लंगर सेवेने केली गोड

नगर – शहरातील जिल्हा रुग्णालय, विविध साहित्य विक्री करुन पालमध्ये राहणारे, रस्त्यावर उघड्यावरचे जीवन जगणाऱ्यांच्या अंगणात दिवे प्रज्वलीत करुन घर घर लंगर सेवेच्या वतीने दिवाळी साजरी करण्यात आली. दिवे प्रज्वलीत करून, फुलझड्यांची आतषबाजी करत आणि फराळाच्या पाकिटांचे वाटप करून समाजातील दुर्बल घटकांच्या जीवनात आनंदाचा दिवा प्रज्वलीत करण्यात आला.

घरापासून दूर असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी जिल्हा रुग्णालय परिसरात विशेष दिवाळी साजरी करण्यात आली. लंगर सेवेच्या सेवादारांनी नातेवाईकांना रुग्णालया बाहेर बोलावून एकत्रित फुलझड्या पेटवून उत्सवाचा आनंद घेतला आणि त्यांना दिवाळी फराळ भेट म्हणून दिला. यावेळी सर्वांसाठी सदृढ आरोग्य व सुखसमृद्धीची प्रार्थना करण्यात आली.

शहरातील विविध रस्त्यांवर फेरीवाले, लहान व्यवसाय करणारे व पालांमध्ये राहणारे कुटुंब या उपक्रमात सहभागी झाले. सेवादारांनी त्यांच्या झोपड्यांमध्ये जाऊन दिवे पेटवले, फटाक्यांची आतषबाजी करुन फराळाचे पाकिट वितरित करण्यात आले. अनोळखी व्यक्तींनी दिलेल्या या प्रेमळ भेटींनी वंचित वर्ग भारावून गेला. या उपक्रमामुळे समाजातील प्रत्येक घटकाला दिवाळीचा आनंद मिळावा, हा संदेश घर घर लंगर सेवेने प्रत्यक्ष कृतीतून दिला.

या दिवाळी पाडव्याच्या दिवशी झालेल्या उपक्रमात हरजितसिंह वधवा, करनसिंग धुप्पड, राजा नारंग, कैलाश नवलानी, सुनील थोरात, दलजीतसिंह वधवा, सिमरजीतसिंह वधवा, लिओ गुरनूरसिंग वधवा, प्रशांत मुनोत, हर्ष किल्हानी, रीत जाजू, आहिल शेख आदी सेवादार सहभागी झाले होते.

कोरोनाच्या काळात गरजू व भुकेल्या नागरिकांना अन्न व मदत पोहोचविणाऱ्या घर घर लंगर सेवेने गेल्या काही वर्षांपासून वंचित घटकांपर्यंत सणांचा आनंद पोहोचवण्याची परंपरा सुरू ठेवली आहे. दिवाळी हा केवळ दिव्यांचा नव्हे तर आनंद वाटण्याचा सण आहे, या भावनेने हा उपक्रम राबवला जातो. लंगर सेवेच्या या कार्यातून माणुसकीचा आणि करुणेचा दिवा समाजात प्रज्वलित करण्यात आला आहे.

या सामाजिक उपक्रमासाठी जनक आहुजा, प्रिथपालसिंग धुप्पर, सतीश गंभीर, गुलशन कंत्रोड, राजू जग्गी, राजेंद्र कंत्रोड, राहुल बजाज, अभिमन्यू नय्यर आदींनी योगदान दिले.

# 'हरदिन ग्रुप'कडून निराधार ज्येष्ठ नागरिकांसह दिवाळी साजरी




नगर – हरदिन मॉर्निंग ग्रुपने यंदाही समाजातील निराधार व वंचित घटकातील ज्येष्ठ नागरिकांसह दिवाळी साजरी कली. भिंगार येथील रोकडेश्वर मंदिर परिसरात आयोजित या उपक्रमात निराधार नागरिकांना मिठाई आणि फराळ वाटप करून त्यांच्याबरोबर फटाक्यांची आतषबाजी करुन दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला. भाऊबीजच्या दिवशी रंगलेल्या या सोहळ्यात बहिणींनी आपल्या भावांना औक्षण करून पारंपरिक वातावरणात सणाचा आनंद लुटला. या कार्यक्रमासाठी महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नंदकुमार (मन्नूशेठ) झंवर, उद्योजक लॉरेन्स स्वामी आणि चुन्नीलाल झंवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, रमेशराव वराडे, सर्वेश सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, अभिजीत सपकाळ, जहीर सय्यद, ईवान सपकाळ, विलास आहेर, सरदारसिंग परदेशी, रतन मेहेत्रे, किरण सपकाळ, अशोकराव पराते, अविनाश जाधव, जयश्रीताई पोटे, प्रांजली सपकाळ, सुरेखाताई आमले, राजश्रीताई राहिंज, संगीता सपकाळ, सुंदरराव पाटील, विठ्ठल (नाना) राहिंज, रामनाथ गर्जे, कोंडीराम वाघस्कर, सखाराम अळकुटे, अशोकराव लोंढे, जालिंदर अळकुटे, सुमित चोपडा, मनोहरराव दरवडे, नवनाथ आमले, सुनील कसबे, संतोष चोपडा, रवी ताठे, रामचंद्र शिंदे, काशिनाथ साळुंके, दीपकराव धाडगे, शशिकांत बोरुडे, भगवानराव दळवी, विजय बोथरा, संजय भिंगारदिवे, शशिकांत पवार, देवा देशपांडे, तुषार घाडगे, अविनाश पोतदार, दशरथराव मुंडे, सुधीर कपाळे, दिलीप गुगळे, दत्तात्रय लाहुंडे, प्रकाश देवळालीकर, शिरीषराव पोटे आदींसह ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, दिवाळी हा सण फक्त दिवे लावण्याचा नाही, तर समाजातील प्रत्येकाच्या मनात आनंदाचा दिवा पेटवण्याचा आहे. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून वंचितांच्या चेहऱ्यावर हास्य आणण्याचा आणि समाजात माणुसकीचा उजेड पसरवण्याचा सातत्याने प्रयत्न सुरु आहे. सतत सामाजिक योगदान देण्याच्या ध्येयाने प्रेरित होवून ग्रुपचे कार्य सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

नंदकुमार झंवर यांनी सांगितले की, दिवाळी हा अंधकार दूर करणारा सण आहे. हरदिन ग्रुपने या सणाचे खरे स्वरूप साकारत वंचितांच्या जीवनात प्रकाश निर्माण केला आहे. या सामाजिक उपक्रमातून खऱ्या अर्थाने दिवाळीचा संदेश समाजात पोहोचवला गेला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

सचिन चोपडा यांनी आजच्या धावपळीच्या जीवनात एकमेकांना वेळ देणं दुर्मिळ झालं आहे. पण हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य सेवा हीच खरी पूजा हे तत्व अंगीकारून वंचितांसाठी कार्य करुन सामाजिक योगदान देत आहे. सर्वांनी मिळून या समाजातील निराधार, ज्येष्ठ, आणि वंचित घटकांसाठी हातभार लावावा. समाज तेव्हाच समृद्ध होतो, जेव्हा प्रत्येक घरात आनंदाचा दिवा तेवतो, असे त्यांनी सांगितले. हरदिन ग्रुपच्या कार्यातून समाजातील तरुणांनी प्रेरणा घ्यावी आणि सामाजिक संवेदनशीलतेचा दिवा प्रत्येक हृदयात प्रज्वलीत करावा. हीच खरी दिवाळी, आणि हाच माणुसकीचा उजेड असल्याचे जयश्रीताई पोटे यांनी सांगितले.

ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, चुन्नीलाल झंवर यांनीही मनोगत व्यक्त करून उपक्रमाचे कौतुक केले.

सर्वेश सपकाळ यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन रमेशराव वराडे यांनी केले. अभिजीत सपकाळ यांनी आभार मानले.




# रुपया सावरण्यासाठी

अमेरिकेने भारताविरोधात लावलेले ५० टक्के आयात शुल्क आणि इतर कारणामुळे गेल्या दोन महिन्यापासून भारतीय रुपयाचे मूल्य डॉलरच्या तुलनेत कमालीच्या वेगाने कमी होत आहे. त्यामुळे भारताच्या आयात- निर्यात संतुलनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत रुपयाचे मूल्य स्थिर ठेवण्यासाठी रिझर्व बँक गेल्या दोन महिन्यापासून प्रयत्न करत आहे.या प्रयत्नांचा भाग म्हणून ऑगस्ट महिन्यामध्ये रिझर्व बँकेने ७.७ अब्ज डॉलरची विक्री करून रुपयाचे मूल्य स्थिर करण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले जाते. रिझर्व बँक परकीय चलनविषयक माहिती आपल्या वेबसाईटवर प्रत्येक आठवड्याला जारी करीत असते.



या आठवड्यात जारी केलेल्या माहितीनुसार ऑगस्ट महिन्यात रिझर्व बँकेने खरेदीपेक्षा जास्त डॉलरची विक्री केली. ऑगस्ट महिन्यात ७.७ अब्ज डॉलरची विक्री रिझर्व बँकेला करावी लागेल.

विशेष म्हणजे जुलै महिन्यात रिझर्व बँकेने केलेल्या डॉलरच्या विक्रीपेक्षा ही विक्री तीन पटीने जास्त आहे. जर रिझर्व बँकेने डॉलरची विक्री केली नसती तर रुपयाचा भाव आणखी कोसलला असता असते समजले जाते.

रिझर्व बँकेने जारी केलेल्या माहितीत आणखी एक बाब समोर आली आहे. ती म्हणजे जुलै आणि ऑगस्टदरम्यान रिझर्व बँकेने जरी ७.७ अब्ज डॉलरची विक्री केली असली तरी या दोन महिन्यात रिझर्व बँकेने एकही डॉलरची खरेदी केली नाही.

रुपयाच्या मूल्यासंदर्भात रिझर्व बँकेच्या वरिष्ठ अधिकार्याकडे पत्रकारांनी वेळोवेळी विचारणा केलेली आहे. मात्र रिझर्व बँक रुपयाचे मूल्य कोणत्या पातळीवर असावे हे ठरवत नाही. रुपयाचे मूल्य अस्थिर झाल्यानंतर रिझर्व बँक रुपयाचे मूल्य स्थिर करण्यासाठी प्रयत्न करते, असे वेळोवेळी सांगण्यात आलेले आहे.

दरम्यान जागतिक व्यापार युद्ध आणि अमेरिकेने भारताविरोधात लावलेले आयात शुल्क या कारणामुळे भारतीय रुपयाचे अवमूल्यन चालूच आहे. ऑगस्ट महिन्यात रिझर्व बँकेने एवढ्या मोठ्या प्रमाणात डॉलरची विक्री करूनही रुपयाचे मूल्य डॉलरच्या तुलनेत १.६ टक्क्यांनी कमी झाले आहे. सप्टेंबर महिन्यात रुपयाचे मूल्य त्याच वेगाने कमी झाले आहे. भारतीय शेअर बाजार आणि रोखे बाजारातून परदेशी संस्थागत गुंतवणूकदार परत जात आहेत, असे समजले जाते. त्यामुळे पुन्हा रुपयाच्या मूल्यावर दबाव येत आहे. ◆◆◆



# दमदार परताव्यासाठी सोने-चांदी की निफ्टी?

## काय सांगतो गेल्या दशकभराचा लेखाजोखा

ऑक्टोबर महिन्यातील भारतीय शेअर बाजाराच्या भरारीने सर्वांनाच स्तीमित केले आहे. दुसरीकडे सोन्याने २० ऑक्टोबर रोजी प्रति १० ग्रॅम १,२७,२७० रुपये असा उच्चांकी भाव नोंदवला आहे. गेल्या दिवाळीत याच सोन्याचा भाव सुमारे ७८,४३० रुपये होता. म्हणजे केवळ एका वर्षात सोन्याने तब्बल ६२ टक्क्यांनी झेप घेतली आहे. २०२५ हे गेल्या दशकातील सर्वांत वेगाने वाढणारे वर्ष ठरले आहे. याच काळात चांदीने तर गुंतवणूकदारांना अधिकच आश्चर्याचा धक्का दिला. मागील वर्षी दिवाळीत प्रति किलो चांदीचा दर ९४,६३१ रुपये होता, जो आता १,५३,९८० रुपयांपर्यंत गेला आहे. म्हणजे जवळपास ६३ टक्के वाढ. सोन्यापेक्षा किंचित अधिक परतावा देत चांदीने या वर्षीचे 'उत्कृष्ट कामगिरीचे' पदक जिंकलं आहे.

या तेजस्वी धातूंच्या चमकदार आकड्यांच्या तुलनेत निफ्टी-५० निर्देशांकाने अधिक संयम दाखवला. गेल्या वर्षीच्या मूहूर्त ट्रेडिंगच्या वेळी निफ्टी २४,३०४ अंकांवर होता, तर यावर्षी तो २५,८४७ अंकांवर पोहोचला. म्हणजेच केवळ ६.३ टक्क्यांची वाढ निफ्टीमध्ये वर्षभराच्या काळात झाली आहे. अल्पकालीन दृष्टीने पाहता हे प्रमाण सोनं आणि चांदीच्या तुलनेत फिके वाटते, मात्र दीर्घकालीन चित्र थोडे वेगळे आहे.

गेल्या दहा वर्षांचा विचार केला, म्हणजे २०१५ ते २०२४ या काळात, निफ्टी-५० निर्देशांकाने तब्बल २११ टक्क्यांचा परतावा दिला आहे. त्याच कालावधीत सोन्याने २०८ टक्के तर चांदीने १७७ टक्के वाढ दर्शवली आहे. यावरून स्पष्ट होते की, अमूल्य धातूंचा बाजार अल्पावधीत चमकत असला तरी दीर्घकालीन गुंतवणुकीच्या दृष्टीने निफ्टी-५० अजूनही सर्वात विश्वासार्ह पर्याय ठरतो. सन २०२५ मध्ये मात्र परिस्थिती वेगळी राहिली. आर्थिक अस्थिरता, जागतिक राजकीय तणाव, तसेच मध्यपूर्वेतील संघर्षामुळे गुंतवणूकदारांनी सुरक्षिततेकडे झुकणारी धोरणे अवलंबली. त्यामुळे 'सेफ हेवन' मानल्या जाणाऱ्या सोनं-चांदीकडे भांडवल वळलं. यामुळेच त्यांच्या किंमतींनी विक्रमी झेप घेतली.

तथापि, या धातूंमध्ये असलेली अस्थिरता अजूनही मोठी आहे. वर्षागणिक चांदीचे दर अधिक चढ-उतार दाखवतात, तर सोनं तुलनेने स्थिर राहते. उदाहरणार्थ, २०२१ मध्ये सोन्याचा भाव घटला पण चांदी थोडीशी वाढली; तर २०१८ मध्ये दोन्ही घसरले. त्याउलट निफ्टीने २०२१ मध्ये ४० टक्क्यांहून अधिक झेप घेतली होती ह्र ही कोविडपश्चात आर्थिक पुनरुत्थानाची झळाळी होती.

२०१५ हे वर्ष मात्र या तीनही पर्यायांसाठी सर्वांत निराशाजनक ठरले होते. त्या वर्षी सोनं आणि चांदी दोन्ही घसरले आणि शेअर बाजारही मंदावला.

पण पुढील काही वर्षांत, विशेषतः २०१९ ते २०२१ दरम्यान, निफ्टीने जबरदस्त पुनरागमन केले. भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुधारणांमुळे, गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढल्यामुळे आणि जागतिक बाजारातील अनुकूल प्रवाहांमुळे निर्देशांकाने भक्कम कामगिरी दाखवली. दुसरीकडे, धातूंच्या किंमतींवर जागतिक मागणी, चलनवाढ, डॉलरचे दर आणि आंतरराष्ट्रीय संघर्षांचा मोठा प्रभाव राहिला. त्यामुळे त्यांची हालचाल अधिक अस्थिर दिसते.

२०२५ मध्ये मात्र परिस्थिती उलटी झाली. जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चिततेमुळे, गुंतवणूकदारांनी पुन्हा एकदा सुरक्षिततेचा मार्ग निवडला आणि सोनं-चांदीची मागणी प्रचंड वाढली. परिणामी निफ्टीपेक्षा त्यांचे परतावे झपाट्याने वर गेले.

मात्र दीर्घकाळ पाहता, निफ्टीचा परतावा अजूनही सोनं आणि चांदीपेक्षा किंचित पुढे आहे. कारण शेअर बाजार गुंतवणुकीत 'कंपाउंडिंग'चा फायदा मोठ्या प्रमाणात मिळतो. तर सोनं-चांदी हे मुख्यत्वे सुरक्षिततेसाठी आणि चलनवाढीविरोधात संरक्षण म्हणून वापरले जाणारे साधन राहते.

गेल्या दशकातील या तुलनेवरून एक गोष्ट स्पष्ट होते ह्र अल्पावधीत सोनं-चांदीची चमक डोळे दिपवणारी असली तरी दीर्घकालीन संपत्ती निर्माण करायची असल्यास शेअर बाजार (विशेषतः निफ्टीसारखे निर्देशांक) अधिक सक्षम आणि स्थिर पर्याय ठरतात. त्यामुळे गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातून, नुसत्या वर्षभरातील परताव्यांच्या मोहात न पडता, दीर्घकालीन शिस्तबद्ध गुंतवणुकीकडे लक्ष दिले पाहिजे. कारण सोनं आणि चांदी वर्षागणिक चमकतात आणि फिकेही पडतात; पण निफ्टीसारखा निर्देशांक सातत्याने भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचे प्रतिबिंब दाखवत राहतो. ◆◆◆

# चांगला क्रेडिट स्कोअर असूनही कर्ज का नाकारले जाते?

अनेकदा आपला क्रेडिट स्कोअर चांगला असतो, बँकेकडून नियमित व्यवहार केलेले असतात, तरीदेखील वैयक्तिक कर्जासाठीचा (पर्सनल लोन) अर्ज नाकारला जातो. अशा वेळी प्रश्न पडतो की नेमके काय चुकले? प्रत्यक्षात, कर्ज देणारी संस्था फक्त क्रेडिट स्कोअरवर निर्णय घेत नाही, तर इतर अनेक घटकांवरही विचार करते.




**१. वयाचा परिणाम :** कर्ज मंजूर करताना वयाचा महत्त्वपूर्ण विचार केला जातो. तरुण नोकरी करणाऱ्या व्यक्तींना बँका जास्त विश्वासार्ह मानतात. कारण त्यांच्याकडे दीर्घ सेवा कालावधी असतो. परंतु ज्यांचे वय निवृत्तीच्या जवळ आलेले आहे किंवा जे लवकरच नोकरी सोडणार आहेत, त्यांचे अर्ज बँक अनेकदा नाकारते. कारण कर्जाचा कालावधी संपण्याआधीच त्यांचे उत्पन्न बंद होण्याची शक्यता असते.

**२. निश्चित उत्पन्नाचा अभाव :** स्वयंरोजगार करणारे लोक किंवा फ्रीलान्सर यांचे उत्पन्न निश्चित नसते. बँकेला प्रत्येक महिन्याचे स्थिर उत्पन्न दिसणे गरजेचे असते. जर उत्पन्न अधूनमधून येत असेल किंवा व्यवसायात स्थैर्य नसेल, तर बँक कर्ज देताना संकोच करते. त्यामुळे अशा अर्जांची नकारात्मक तपासणी होते.

**३. आधीचे कर्ज बाकी असणे :** जर एखाद्या व्यक्तीवर आधीच मोठ्या रकमेचे कर्ज बाकी असेल आणि त्याच्या मासिक उत्पन्नाच्या निम्म्याहून अधिक भाग त्या कर्जाच्या हप्त्यात जात असेल, तर नवीन कर्ज मंजूर होण्याची शक्यता कमी होते. विद्यमान जबाबदाऱ्या पूर्ण करून अर्जदाराला नवीन कर्जाचे हप्ते परवडतील का, हे बँक पडताळून पाहते.


**४. मागितलेली कर्ज रक्कम जास्त असणे :** कधी कधी व्यक्ती स्वतःच्या गरजेनुसार कर्जमागणी केली जाते; पण क्रेडिट स्कोअर उत्कृष्ट असला तरी, पगाराच्या तुलनेत कर्जाची मागणी खूप मोठी असेल तर बँक तो अर्ज नाकारते. कारण परतफेडीची क्षमता (रिपेमेंट कॅपेसिटी) कमी असल्यास धोका वाढतो.

**५. नोकरीचा करार अल्पकालीन असणे :** ज्यांची नोकरी करारावर आधारित आहे आणि तो करार काही महिन्यांत किंवा एका वर्षात संपणार असेल तर अशा लोकांचे अर्जही बँका नाकारतात. कारण कर्जाचा कालावधी दीर्घ असतो आणि नोकरी संपल्यावर उत्पन्न थांबण्याची शक्यता असते.

**इतर महत्वाचे मुद्दे :** कर्ज अर्ज करताना बँक तुमच्या संपूर्ण आर्थिक इतिहासाचा (फायनान्शियल बॅकग्राऊंड) अभ्यास करते. वेळोवेळी कर्जाची परतफेड केली नसेल, किंवा पूर्वीचे हप्ते थकलेले असतील, तर तुमच्यावरील विश्वास कमी होतो. कर्जासाठी अर्ज वारंवार केल्यास क्रेडिट प्रोफाईल कमजोर दिसते.त्यामुळे केवळ चांगला क्रेडिट स्कोअर पुरेसा नसतो. बँकेला तुमच्या उत्पन्नाची नियमितता, आर्थिक जबाबदाऱ्या, वय, नोकरीतील स्थैर्य आणि परतफेडीची क्षमता या सर्व गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. त्यामुळे वैयक्तिक कर्ज अर्ज करण्यापूर्वी या सर्व घटकांचा बारकाईने विचार करणे आवश्यक आहे. असे केल्यास अर्ज नाकारला जाण्याची शक्यता कमी होते आणि आर्थिक नियोजन अधिक सुरक्षित बनते.

◆◆◆

# ई-फायलिंग पोर्टलवर नवे फिचर




आयकर विभागाने आपल्या ई-फायलिंग पोर्टलवर एक नवे फिचर सुरू केले आहे. या माध्यमातून करदात्यांना आता त्यांचे सबमिशन संबंधित अधिकारी म्हणजेच असेसिंग ऑफिसर (ए.ओ.) किंवा कमिशनर ऑफ इनकम टॅक्स (अपील) ह्यांनी नेमक्या कोणत्या दिवशी आणि कोणत्या वेळेला पाहिले आहे हे समजू शकणार आहे. तज्ज्ञांच्या मते हा उपक्रम करप्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणणारा, तंट्यांचे प्रमाण कमी करणारा आणि फेसलेस असेसमेंट प्रणालीवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ करणारा ठरु शकतो. या नव्या फीचरमुळे आधी असलेली अनिश्चितता दूर होईल आणि करदात्यांना आपल्या उत्तरांवर खरोखरच कारवाई होत आहे, याची खात्री मिळेल.

**या अपडेटचे प्रमुख फायदे असे आहेत:**

१. तात्काळ माहिती: करदात्याला त्याचे दस्तऐवज किंवा उत्तर अधिकाऱ्याने कधी उघडले हे तात्काळ समजेल.
२. अधिकाऱ्यांची जबाबदारी: प्रत्येक टप्प्याची वेळ नोंदवली जाते, त्यामुळे कोणत्याही विलंबाचा किंवा वादाचा ठोस डिजिटल पुरावा तयार राहील.
३. कार्यक्षमता वाढ: अधिकाऱ्यांवर ठराविक वेळेत काम पूर्ण करण्याचा दबाव राहील, कारण त्यांच्या प्रत्येक कार्याचा डिजिटल मागोवा घेतला जाईल.
४. फेसलेस असेसमेंटमध्ये विश्वास: प्रत्येक कृती नोंदली गेल्याने प्रणालीची निष्पक्षता आणि पारदर्शकता स्पष्टपणाने समोर येईल.

फेसलेस असेसमेंट योजनेत सर्वात मोठी अडचण होती ती संवादाची. करदात्यांना हे माहीतच नसतं की त्यांच्या उत्तरांकडे कोणी लक्ष दिलं आहे की नाही. आता नव्या फीचरमुळे आपली कागदपत्रे पाहिली गेली आहेत, याची खात्री मिळेल. तसेच आता करदात्यांना त्यांनी दिलेल्या उत्तरांकडे दुर्लक्ष झाले नाही, हे सिद्ध करता येईल. काही कारणाने उत्तर न पाहताच आदेश जारी झाला, तर हा नोंदवलेला डेटा पुरावा म्हणून वापरता येईल.

ह्र उदाहरण: समजा, एखाद्या करदात्याला कलम १४३(१) अंतर्गत नोटीस आली आणि त्याने उत्तर दिले असेल, तर आता तो तपासू शकतो की अधिकाऱ्याने त्याचे उत्तर पाहिले की नाही. यामुळे चुकीच्या किंवा अपूर्ण तपासावर आधारित आदेश दिले जाण्याची शक्यता कमी होईल आणि न्यायालयीन वाद टाळले जातील. या नव्या सुविधेमुळे करदात्यांच्या गोपनीयतेवर कोणताही परिणाम होत नाही. कारण हा ऑडिट ट्रेल फक्त त्या संबंधित करदात्यालाच दिसतो. त्यामुळे त्याची संवेदनशील माहिती पूर्णपणे सुरक्षित राहते. एकंदरीत, ई-फायलिंग पोर्टलवरील ही सुधारणा भारताच्या करप्रणालीमध्ये डिजिटल जबाबदारी आणि पारदर्शकतेच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार आहे.

◆◆◆

# खर्च आणि हप्ते भरून क्रेडिट स्कोअर कसा टिकवावा?

दिवाळी म्हणजे आनंद, सजावट, भेटवस्तू आणि खरेदीचा हंगाम. मात्र या सणाच्या उत्साहात अनेकजण विचार न करता खर्च करतात आणि नंतर आर्थिक ताण वाढतो. क्रेडिट कार्डवरील अनियंत्रित खर्च किंवा हप्ते उशिरा भरल्यामुळे क्रेडिट स्कोअर कमी होऊ शकतो. त्यामुळे या दिवाळीत आनंद साजरा करतानाच आपल्या आर्थिक आरोग्याचीही काळजी घेणे आवश्यक आहे.




**१. सणासाठी स्वतंत्र बजेट तयार करा :** दिवाळीच्या खरेदीसाठी आधीच एक स्वतंत्र बजेट ठरवणे ही सर्वात महत्त्वाची पायरी आहे. घर सजावट, भेटवस्तू, मिठाई, कपडे आणि इतर आवश्यक गोष्टींसाठी स्वतंत्र मर्यादा ठरवा. गरजेच्या आणि इच्छांच्या खर्चामध्ये स्पष्ट फरक करा. फक्त सणाचा उत्साह म्हणून अनावश्यक वस्तू खरेदी करू नका. खरेदी आधीच नियोजित केल्यास शेवटच्या क्षणी अनावश्यक किंवा महागड्या वस्तूंवर खर्च होण्यापासून बचाव होतो. तसेच, सर्व खर्चांसाठी फक्त क्रेडिट कार्डच वापरू नका. काही व्यवहार रोख, डेबिट कार्ड किंवा यूपीआयद्वारे करा. यामुळे क्रेडिट कार्डची मर्यादा ओलांडली जाणार नाही आणि देणी वेळेत भागवता येतील.

**२. फक्त मोठी खरेदी नव्हे, स्मार्ट खरेदी करा :** दिवाळीत ऑफर आणि सवलतींची रेलचेल असते. मात्र प्रत्येक सवलत तुमच्यासाठी गरजेची असेलच असे नाही. त्यामुळे प्रत्येक खरेदीपूर्वी थोडा विचार करा. मोबाईल, टीव्ही, लॅपटॉपसारख्या महागड्या वस्तू घेताना वेगवेगळ्या वेबसाइट्सवर किंमती तपासा आणि योग्य सवलत असलेली निवडा.

तुमचा क्रेडिट वापराचा प्रमाण (Credit Utilisation Ratio) ३० टक्क्यांपेक्षा जास्त होऊ देऊ नका. म्हणजेच क्रेडिट मर्यादेच्या तुलनेत कमी रक्कम वापरा. सर्व लहान खरेदींसाठी कार्डचा वापर करण्याऐवजी फक्त मोठ्या आणि आवश्यक खरेदींसाठीच ते वापरा.

**३. वेळेवर हप्ते आणि बिल भरणे प्राधान्य द्या :** क्रेडिट कार्डचे बिल किंवा कर्जाचा हप्ता वेळेवर आणि पूर्ण भरणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. फक्त 'मिनिमम पेमेंट' करून चालत नाही, कारण त्यामुळे व्याज वाढते आणि क्रेडिट स्कोअर कमी होतो. शक्य असल्यास ऑटो-डेबिट सुविधा सक्रिय करा, जेणेकरून कोणताही हप्ता चुकणार नाही.

एकदाही हप्ता चुकल्यास किंवा बिल उशिरा भरल्यास त्याचा दीर्घकालीन नकारात्मक परिणाम क्रेडिट स्कोअरवर होऊ शकतो. दिवाळीच्या काळात तुमचा क्रेडिट रिपोर्ट नियमित तपासा. चुकीचे व्यवहार किंवा फसवणूक लवकर ओळखता येतात. जर काही त्रुटी दिसली तर त्वरित दुरुस्तीची मागणी करा.

**शेवटी काय लक्षात ठेवावे? :** दिवाळीचा आनंद साजरा करताना आर्थिक शिस्त पाळली, तर भविष्यातील कर्जसंधी आणि क्रेडिट रेटिंग दोन्ही सुरक्षित राहतात. स्मार्ट बजेटिंग, मर्यादित क्रेडिट वापर आणि वेळेवर परतफेड ह्र या तीन गोष्टी पाळल्यास तुम्ही दिवाळीचा उत्सव आनंदात आणि निर्धास्तपणे साजरा करू शकता, आर्थिक ताणाशिवाय.

◆◆◆

# सात लाखांच्या विम्याविषयी...

तुम्ही खासगी क्षेत्रात काम करत असाल, तर प्रत्येक महिन्याच्या तुमच्या पगारातून थोडा-थोडा पैसा कपात होतो आणि तो तुमच्या पीएफ खात्यात जमा होतो. बहुतेक लोकांना वाटते की हा पैसा फक्त निवृत्तीच्या वेळीच काम येईल, पण खरी गोष्ट काही वेगळी आहे. पीएफसोबत आणखी एक योजना आहे, ती म्हणजे




एम्प्लॉईज डिपॉझिट लिंकड् इन्शुरन्स स्किम (ईडीएलआय). ही सामान्य स्कीम नसून ईपीएफओकडून दिली जाणारी एक जीवन विमा सुविधा आहे, जी कठीण काळात कुटुंबाला मोठा आधार देते. जर एखाद्या कर्मचाऱ्याचा नोकरी दरम्यान मृत्यू झाला, तर त्याच्या कुटुंबियांना या योजनेंतर्गत ७ लाख रुपयांपर्यंतचे विमा कवच मिळू शकते आणि तेही एक रुपयाही खर्च न करता.

मागील वर्षी ऑक्टोबरमध्ये कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी या स्कीम संदर्भात जाहीर केले की एप्रिल २०२१ पासून लागू झालेल्या वाढीव लाभांना 'रेट्रोस्पेक्टिव्ह' पद्धतीने दिले जाईल. म्हणजे, नोकरी बदलणाऱ्यांना किंवा जुन्या क्लेम्स असलेल्या कर्मचाऱ्यांनाही याचा फायदा मिळेल.

भारतामध्ये खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कर्मचार्यांसाठी ईडीएलआय हा एक मोठा आधार आहे. १९७६ मध्ये कर्मचारी भविष्य निधि संस्थेने ही स्कीम सुरू केली होती. ही स्कीम कर्मचारी भविष्य निधि आणि कर्मचारी पेन्शन स्कीम सोबत एकत्र काम करते. या योजनेंतर्गत एखाद्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला, तर त्यांच्या नॉमिनी किंवा कायदेशीर वारसदारांना एकत्रित रक्कम दिली जाते. ही रक्कम कर्मचाऱ्याच्या शेवटच्या पगारावर आधारित असते.

२८ एप्रिल २०२१ पासून, इपीएफओने या रक्कमेची कमाल मर्यादा ७ लाख रुपये ठेवली आहे. खास बाब म्हणजे, या स्कीममध्ये कर्मचाऱ्याला कोणताही योगदान देण्याची गरज नाही. संपूर्ण खर्च एम्प्लॉयर उचलतो, जो कर्मचाऱ्याच्या बेसिक पगाराच्या ०.५% देतो. ही रक्कम प्रति महिना कमाल ७५ रुपये इतकीच आहे. ही स्कीम सर्व ईपीएफ सदस्य कर्मचाऱ्यांना कव्हर करते. यामध्ये कुठलाही अपवाद नाही. कर्मचाऱ्याचा मृत्यू भारतामध्ये किंवा परदेशात झाला तरी नॉमिनीला फायदा मिळतो. शिवाय, हे कव्हरेज २४ तास लागू राहते. म्हणजे केवळ कामाच्या वेळीच नाही तर सतत सुरक्षा मिळते.

जर एखादी कंपनी हवी असल्यास ईडीएलआयऐवजी कर्मचाऱ्यांसाठी दुसरी ग्रुप लाइफ इन्शुरन्स पॉलिसी घेऊ शकते, परंतु त्याचा फायदा ईडीएलआयपेक्षा कमी नसावा. २० किंवा त्याहून जास्त कर्मचारी असलेल्या संस्थांना ईपीएफ कायद्यानुसार नोंदणी करावी लागते. नोंदणी केल्यानंतर त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांना ईडीएलआयच्या कक्षेत आणले जाते.

◆◆◆

# बीटीएसटी ट्रेडिंग म्हणजे काय?

शेअर बाजारातील जलद नफा कमावण्याच्या प्रयत्नात असलेल्या ट्रेडर्सकडून अनेक वेगवेगळ्या रणनीती वापरल्या जातात. त्यापैकी एक लोकप्रिय रणनीती म्हणजे बीटीएसटी ट्रेडिंग (बाय टुडे, सेल टुमारो) अर्थात आज खरेदी करा, उद्या विक्री करा. नावावरूनच स्पष्ट होते की या पद्धतीत एखादा ट्रेडर एके दिवशी शेअर खरेदी करून दुसऱ्या दिवशी विक्री करू शकतो, अगदी त्या शेअर्सची डिलिव्हरी डीमॅट खात्यात येण्यापूर्वीच.

**बीटीएसटी ट्रेडिंगची मूलभूत रचना समजून घ्या :** भारतीय शेअर बाजारात टी+१ सेटलमेंट सायकल लागू आहे. म्हणजे तुम्ही सोमवारी शेअर्स खरेदी केले, तर ते मंगळवारी तुमच्या डीमॅट खात्यात जमा होतात. पण बीटीएसटी ट्रेडिंगमध्ये शेअर्स अद्याप खात्यात आलेले नसले तरी तुम्हाला मंगळवारीच विक्री करण्याची मुभा असते.

उदाहरणार्थ समजा तुम्ही सोमवारी एखाद्या कंपनीचे १०० शेअर्स प्रत्येकी ₹५०० ला खरेदी केले. मंगळवारी त्याच शेअरची किंमत ₹५२० झाली. तुम्ही ते १०० शेअर्स ₹५२० ला विकले, म्हणजे तुम्हाला ₹२००० नफा मिळतो आणि तेही शेअर्स खात्यात येण्याआधीच. अशा प्रकारे बीटीएसटी ट्रेडिंगद्वारे किंमत बदलांचा फायदा अल्पावधीत घेता येतो.

**बीटीएसटी ट्रेड सुरू करण्याआधी लक्षात ठेवावयाच्या गोष्टी**




**१. शेअरची लिक्विडिटी :** नेहमी असे शेअर्स निवडा जे सहज खरेदी-विक्री होतात. न चालणारे शेअर्स घेतल्यास पुढील दिवशी विक्री करणे अवघड जाऊ शकते.

**२. बाजारातील बातम्या आणि घटना :** कंपनीसंबंधी घोषणा, अर्थसंकल्प, आंतरराष्ट्रीय संकेत अशा बातम्यांचा परिणाम शेअरच्या किमतींवर होतो. म्हणून ट्रेड करण्यापूर्वी सर्व घडामोडी तपासा.

**३. शेअरचा अस्थिरपणा :** सतत वेगवान चढ-उतार होत असलेल्या शेअर्सपासून दूर राहा. विशेषतः जर तुम्ही नवशिके असाल तर ही गोष्ट आवर्जून तपासा. कारण किंमत उलट दिशेने गेल्यास तोटा होऊ शकतो.

**४. ब्रोकरकडून बीटीएसटीला परवानगी आहे का हे तपासा :** सर्वच ब्रोकर बीटीएसटी ट्रेडिंग देत नाहीत. त्यामुळे सर्वांत आधी ब्रोकरकडे ही सुविधा आहे का हे विचारुन घ्या.

**५. शॉर्ट डिलिव्हरीचा धोका :** तुम्ही विक्री करत असलेले शेअर्स अजून खात्यात आलेले नसल्याने, मूळ विक्रेत्याने शेअर्स न दिल्यास शॉर्ट डिलिव्हरी होऊ शकते. अशावेळी दंड किंवा तोटा होऊ शकतो.

**बीटीएसटी ट्रेडिंगचे फायदे**

एका दिवसात किंमत वाढल्यास चांगला नफा मिळू शकतो. यासाठी पूर्ण रकमेची गरज नसते. कमी मार्जिनमध्येही व्यवहार करता येतो. दुसऱ्या दिवशी व्यवहार संपवता येत असल्याने बाजारातील दीर्घकालीन बदलांचा परिणाम होत नाही.डिलिव्हरी घेतली जात नसल्याने विक्रीच्या बाजूचा एसटीटी लागू होत नाही.

**बीटीएसटी ट्रेडिंगचे तोटे**

मूळ विक्रेत्याने शेअर्स न दिल्यास ब्रोकरला ऑक्शनमध्ये ते खरेदी करावे लागतात आणि तोटा तुमच्यावर येतो. रात्रीच्या बातम्या किंवा जागतिक बाजारातील बदलांमुळे दुसऱ्या दिवशी किंमत खाली येऊ शकते. फक्त एकाच दिवसात विक्री करावी लागते. किंमत न वाढल्यास तोटा पत्करावा लागतो. अल्प नफा मिळाल्यास यासाठी द्याव्या लागणाऱ्या शुल्कांमुळे फायदा कमी होऊ शकतो.

**कोणासाठी योग्य आहे बीटीएसटी ट्रेडिंग?**

जे दररोज बाजाराचे निरीक्षण करतात, ज्यांना किंमत विश्लेषण व तांत्रिक संकेतांची माहिती आहे, जे दीर्घकालीन गुंतवणूक नको म्हणतात, अल्प भांडवलावर जलद परतावा हवा असतो, अशांसाठी बीटीएसटी ट्रेडिंगचा पर्याय उपलब्ध आहे. आज खरेदी, उद्या विक्री हे ऐकायला सोपे असले तरी ते यशस्वीरीत्या करण्यासाठी शिस्त, जोखीम व्यवस्थापन आणि बाजाराचे ज्ञान आवश्यक आहे. योग्य नियोजनासह केल्यास बीटीएसटी ट्रेडिंग ही अल्पकालीन नफ्याची प्रभावी पद्धत ठरू शकते, पण यातील जोखीम प्रचंड आहे, हे लक्षात ठेवा.

◆◆◆

# महापालिकेच्या ८० घंटागाड्या कचरा संकलनासाठी शहरात धावणार

नगर – देशामध्ये इंदोर हे स्वच्छ शहर म्हणून ओळखले जात असून आपले शहर देखील स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करू यासाठी नागरिकांच्या सहकार्याची खरी गरज आहे. शहरात गेल्या काही दिवसांपासून कचऱ्याची समस्या निर्माण झाली होती आता शहरात महापालिकेच्या माध्यमातून घंटागाड्या धावणार असून नागरिकांनी आपला कचरा घंटागाड्यांमध्येच टाकावा मुंबईमध्ये ज्याप्रमाणे रस्ता काँक्रिटीकरणाचे कामे झाली आहे त्याचप्रमाणे आपल्या शहरात देखील सुरू आहे. काही संस्थांच्या माध्यमातून चौक सुशोभीकरणाचे कामे सुरू असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.



वाडिया पार्क येथे आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने ८० घंटागाड्या कचरा संकलन कामाचा शुभारंभ हायजिन फर्स्टच्या संस्थापिका वैशाली गांधी यांच्या हस्ते झाला. यावेळी आमदार संग्राम जगताप, आयुक्त यशवंत डांगे आदी. (छाया – लहू दळवी)

वाडिया पार्क येथे आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने ८० घंटागाड्या कचरा संकलन कामाचा शुभारंभ हायजिन फर्स्टच्या संस्थापिका वैशाली गांधी यांच्या हस्ते झाला. यावेळी आमदार संग्राम जगताप, आयुक्त यशवंत डांगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, संजय शेंडगे, उपायुक्त संतोष टेगळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, दीपक सूळ, स्थायी समितीचे माजी चेअरमन किशोर डागवाले, मनोज कोतकर, कुमारसिंह वाकळे, अविनाश घुले, माजी नगरसेवक संजय चोपडा, रेश्मा आठरे, लता शेळके, निखिल वारे, सचिन जाधव, शिवाजी चव्हाण, धनंजय जाधव, संभाजी पवार, बाळासाहेब पवार, अजिंक्य बोरकर, प्रकाश भागानगरे, विनीत पाऊलबुद्धे, रामदास आंधळे,अमोल गाडे, प्राध्यापक माणिकराव विधाते, हनुमंत कातोरे, विजय गव्हाळे, सचिन शिंदे, अरविंद शिंदे, अजय चितळे, मनोज साठे, दत्ता मुदगल, युवराज शिंदे, विपुल शेटीया, ज्ञानदेव पांडुळे, दगडू मामा पवार, संजय ढोणे, सुनील त्रिंबके, सतीश शिंदे, महेश लोंढे, महेश तवले, अभिजीत बोरुडे, जितू गंभीर, वैभव ढाकणे, वैभव वाघ, शंभू गिरवले, सुनील कोतकर, महेंद्र कांबळे, संतोष ढाकणे, सारंग पंधाडे, रणजीत सत्रे, जालिंदर कोतकर, सुमित लोंढे, नितीन शेलार, प्रदीप परदेशी, सुरेश बनसोडे, अतुल जाधव, गोरख पडोळे, दीपक खेडकर, अमित खामकर, मेहूल भंडारी, प्रशांत बेल्हेकर, सोनू घेंबुड, सुजय मोहिते, अशोक साबळे आदीसह पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, शहरांमधील कचरा संकलन करण्यासाठी स्वयंभू ट्रान्सपोर्ट ही एजन्सी नव्याने नेमली असून ८० घंटागाड्या घरोघरी जाऊन कचऱ्याचे संकलन करणार आहे, याचबरोबर घंटागाडी आपल्या घरी नाही आली तर हेल्पलाइनवर फोन करावा तातडीने घंटागाडी उपलब्ध होईल, देशामधील स्वच्छतेच्या स्पर्धेमध्ये ड वर्ग महापालिका क्षेत्रामध्ये अहिल्यानगर महानगरपालिकेचा देशात पाचवा क्रमांक आला आहे हाच क्रमांक एक पर्यंत घेऊन जायचं आहे तरी शहरातील प्रत्येक नागरिकांनी आपला कचरा घंटागाडीमध्येच टाकावा असे आवाहन त्यांनी केले.

वैशाली गांधी म्हणाल्या की संस्थेच्या माध्यमातून हायजिन सिटी बनवण्याचे काम सुरू आहे आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून आपले शहर स्वच्छ राहावे यासाठी घंटागाड्या उपलब्ध झाले आहे तरी शहरातील नागरिकांनी आपले घर ज्याप्रमाणे स्वच्छ ठेवतो त्याप्रमाणे आपला परिसर व शहर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा असे त्या म्हणाल्या

मनोज कोतकर म्हणाले की गेल्या काही दिवसापासून शहरात कचऱ्याची समस्या निर्माण झाली होती ती सोडविण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी प्रयत्न केले असल्यामुळेच ८० घंटागाड्या उपलब्ध झाल्या आहेत. आता कचऱ्याचा प्रश्न मार्गी लागला जाईल असे ते म्हणाले.

### रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यावर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करावी

शहरातील काही नागरिक घंटागाडी येऊन देखील रस्त्यावर नालीमध्ये कचरा टाकण्याचे काम करत आहे तसेच बांधकाम साहित्य सर्वत्र पडलेले दिसत आहे त्यामुळे गटारी बंद झाले आहे महापालिकेने आतापर्यंत रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यावर कुठलीही कारवाई केली नाही यापुढील काळात जो कोणी रस्त्यावर कचरा टाकेल त्याच्यावर कायदेशीर व दंडात्मक कारवाई महापालिका प्रशासनाने करावी उपायुक्त दर्जेच्या अधिकाऱ्यांना जर काम करायचे नसेल तर त्यांचे प्रस्ताव शासनाकडे पाठवावे त्यांनी देखील शहरात फिरून काम केले पाहिजे अन्यथा त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल असा इशारा आमदार संग्राम जगताप यांनी दिला.

# फ्लेक्स बोर्डचा बाजार महापालिकेने उठवला पण रस्त्यावर भरणारा भाजी बाजार कधी उठवणार?

## केडगावच्या लिंक रोड वरील भाजी बाजारामुळे वाहतूक कोंडी, अपघात होण्याची ही शक्यता

नगर – केडगाव उपनगरातील लिंक रोड वर मोठ्या प्रमाणात अनाधिकृत फ्लेक्स बोर्ड लावण्यात आले होते. महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाईची मोहीम राबवून फ्लेक्स बोर्ड चा बाजार उठवला, मात्र या रस्त्यावर भरणाऱ्या भाजी बाजारामुळे या रस्त्याचा श्वास गुदमरला असून हा बाजार महापालिका कधी उठवणार असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.


केडगाव उपनगरातील लिंक रोड वर भरणारा भाजी बाजार छायाचित्रात दिसत आहे. (छाया – अमित मन्यार)

केडगाव उपनगर झपाट्याने वाढत चाललेल आहे. यातच केडगावच्या हद्दीतून जाणारे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणारे दोन प्रमुख डीपी रस्ते यामधील एक अर्चना हॉटेल ते कांदा मार्केट रस्ता आणि दुसरा अत्यंत रहदारीतून जाणारा पुणे – कल्याण महामार्गाला जोडणारा लिंक रोड या रस्त्यावर सकाळी व संध्याकाळी अत्यंत रहदारी असते. अनेक ज्येष्ठ नागरिक याच रस्त्यावर सायंकाळी शतपावली करत असतात अशा गजबजलेल्या लिंक रोडवर सध्या फ्लेक्स बोर्डच्या जाहिरातींनी थैमान घातले होते. यामध्ये अनेकांनी फ्लेक्स च्या माध्यमातून जाहीरातबाजी करत फ्लेक्स बोर्ड चा बाजारच भरवला होता मनपाच्या अतिक्रमण विभागाने २४ ऑक्टोबर रोजी धडक कारवाई करत लिंक रोडवरील फ्लेक्स बोर्ड काढण्याची मोहीम फत्ते केली.

लिंक रोडचे सिमेंट काँक्रीट करून रुंदीकरण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात आले. रस्ता रुंदीकरणामुळे मोठा झाला असला तरी तो पुन्हा भाजीविक्रेत्यांमुळे पुन्हा आहे तितकाच अरुंद झाला आहे. याच रस्त्यावर अनेक भाजी विक्रेत्यांनी ठाण मांडत आपला व्यवसाय सुरू केला आहे वेळीच अशा अतिक्रमणधारकावर कारवाई झाली नाही तर दिवसेंदिवस हा रस्ता पुन्हा अतिक्रमांच्या विळख्यात सापडल्याशिवाय राहणार नाही. या रस्त्यावर अवजड वाहतूक देखील मोठ्या प्रमाणात चालू असते. अतिवृष्टीमुळे सीना नदीला आलेल्या पुरामुळे नगर कल्याण महामार्ग काही काळ बंद करण्यात आला होता या रस्त्यावरील सर्व वाहतूक याच लिंक रोड मार्गे वळविण्यात आली होती .त्यावेळेस देखील लिंक रोडवर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. भाजीविक्रेत्यांमुळे दुचाकी वाहनांना तसेच पायी चालणाऱ्या नागरिगांकाना बरोबर रस्त्याच्या मधोमध चालावं लागते यामुळे छोटे–मोठे अपघात देखील या ठिकाणी होत असतात प्रशासनाने यावर वेळीच कारवाई करणे अपेक्षित आहे. एखाद्या अवजड वाहनाने मोठा अपघात होण्याची प्रशासन वाट पाहतेय का ? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

# ग्रामस्थांसमोर मारहाण करत तरुणाचे अपहरण

## दुकानाची तोडफोड; महापुरुषांच्या मूर्तीची विटंबना,कुटुंबीयांना शिवीगाळ करत मारहाण

नगर – भरदिवसा ग्रामस्थांसमोर एका तरुणाचे जीवे मारण्याच्या उद्देशाने अपहरण करण्याची घटना नगर तालुक्यातील हातवळण गावामध्ये २५ ऑक्टोबरला दुपारी घडली. यावेळी तरुणाच्या कुटुंबीयांना मारहाण, शिवीगाळ करण्यात आली. आरोपींची दहशत एवढी होती की ग्रामस्थांसमक्ष दुकानाची तोडफोड, छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची विटंबना देखील करण्यात आली. सदर घटनेबाबत नगर तालुका पोलीस ठाण्यात ४ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


हातवळण येथील तरुणाच्या सलून दुकानाची झालेली तोडफोड

तुकाराम महादेव यादव (वय २५, रा. हातवळण, ता.नगर) असे अपहरण झालेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत त्याची पत्नी सुमन तुकाराम यादव हिने रात्री उशिरा नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास गणेश काकडे, माऊली पठारे (पूर्ण नाव माहित नाही), सुनील दिलीप पठारे, अक्षय भंडारी (सर्व रा. बनपिंप्री, ता.श्रीगोंदा) हे चौघेजण हातवळण गावातील घरी आले. त्यांनी विचारले तुझा नवरा कोठे आहे. त्याने माझ्याकडून घेतलेले पैसे अजून दिले नाही. त्यावेळी त्यांना सर्व पैसे दिले असल्याचे सांगितल्याने राग आला. त्यांनी सर्वांनी शिवीगाळ करून एकाने हाताला धरून बाहेर ओढले. तसेच नवरा व सासरा यांचे हातपाय काढण्याची धमकी दिली.

त्यानंतर हातवळण गावातील चौकामध्ये असणाऱ्या सलूनच्या दुकानात पतीस लाथा बुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. दुकानातील खुर्च्या, आरसा, फॅन, फर्निचर, सलून साठी लागणाऱ्या मशनरी तसेच इतर साहित्याची तोडफोड करून काही साहित्य बाहेर फेकून दिले. हातवळण ग्रामस्थांच्या समक्ष दुकानातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची तोडफोड करून खाली टाकत विटंबना केली. फिर्यादीमध्ये १८ ग्रामस्थांची नावे देण्यात आली असून त्यांच्या समक्ष दुकानाची तोडफोड व छत्रपती शिवाजी महाराजांची विटंबना झाल्याचे ही नमूद करण्यात आले आहे. तसेच पती तुकाराम यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने वरील चौघांनी उचलून नेऊन पळून नेले असे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध बीएनएस कलम १४० (१), ३३३, २९८, ३२४ (४), ११५, ३५२, ३५१ (२) (३) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

भरदिवसा गावातील चौकामध्ये आरोपींकडून दहशत निर्माण करत तरुणाचे अपहरण करण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची विटंबना करण्यात आली. यामुळे समस्त हातवळण ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत होता. तसेच महापुरुषाच्या मूर्तीची विटंबना व गावामध्ये दहशत निर्माण करणाऱ्या आरोपींविरोधात कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे. घटनेचा अधिक तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# गुरुद्वारा भाई दया सिंग अहिल्यानगर यांचा महाराष्ट्र शासनातर्फे गौरवशाली सन्मान

नगर – महाराष्ट्र शासन व मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाच्या आमंत्रणावरून अहिल्यानगर येथील गुरुद्वारा भाई दया सिंग यांच्या सेवादारांना हिंद दी चादर – श्री गुरु तेग बहादुर साहिब जी ३५० वी शहिदी शताब्दी या राज्यस्तरीय समागमाच्या निमित्ताने मुंबई येथे आयोजित कार्यशाळा बैठकीस उपस्थित राहण्याचा सन्मान प्राप्त झाला. या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्ञानि संत बाबा हरनाम सिंग (मुखी दमदमी टकसाल), मंत्री गिरीश महाजन, मा. आमदार बाबू सिंग महाराज आणि पोहरा देवीचे महंत सुनील महाराज सतिंदर सरताज (गायक व गीतकार), मलकीत सिंग बल (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी), जसपाल सिंग सिद्धू (अध्यक्ष, सुप्रीम कौन्सिल महाराष्ट्र सिख कोऑर्डिनेशन कमिटी), चरणदीप सिंग (सदस्य, महाराष्ट्र अल्पसंख्याक आयोग), रुचेश जयवंशी (सचिव, अल्पसंख्याक विभाग, महाराष्ट्र शासन) आदी उपस्थित होते.




या बैठकीत गुरुद्वारा भाई दया सिंग आणि शीख समाजाचे अध्यक्ष बलदेव सिंग वाही, अमरप्रीत सिंग वाही, रवींदर सिंग नारंग, राजिंदर सिंग चावला, अशविंदर सिंग मल्होत्रा आणि हरप्रीत सिंग नारंग हे सेवादार सहभागी झाले. बैठकीत श्री गुरु तेग बहादुर साहिबच्या शहिदीचे महत्त्व व संदेश याचा प्रचार, सिखी प्रचार आणि राज्यभर होणाऱ्या शहिदी शताब्दी समागमांच्या आयोजनाबाबत सविस्तर चर्चा झाली. या प्रसंगी स. सतिंदर सरताज यांनी रचलेले आणि गायलेले हिंद दी चादर हे गीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संत बाबा हरनाम सिंग यांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आले.

यावेळी गुरुद्वारा भाई दया सिंग, अहिल्यानगर यांच्या ऐतिहासिक महत्त्वाची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बाबा हरनाम सिंग सतिंदर सरताज यांना दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सर्व प्रशासकीय सहकार्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी गुरुद्वारा भाई दया सिंग यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच विविध समाजांतील सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी आणि इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

या प्रसंगी अध्यक्ष बलदेव सिंग वाही यांनी सांगितले की, हा सन्मान फक्त गुरुद्वारा भाई दया सिंग सेवादारांचा नसून, तो अहिल्यानगरच्या सर्व नानक नाम लेवा संगतांचा आहे.


## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

Truhome FINANCE

**मुख्य कार्यालय :** लेव्हल –३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी–२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१; **दूरध्वनी:** १८००१०२४३४५, **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in **नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र. ११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई–६०००१८; ; **शाखा कार्यालय:** २०२, दुसरा मजला, मदने आर्केड, एफ.टी.नं.१४२ झोपडी कॅन्टीन जवळ, आर.बी.एल. बँके समोर, सावेडी रोड, अहमदनगर ४१४००३

**परिशिष्ट–४–ए (नियम ८(६) ची तरतूद पहा) स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ सहवाचिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीअन्वये स्थावर मालमत्तेचे विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार आणि जामिनदारांना येथे सूचना देण्यात येत आहे की, **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली नमूद केलेले कर्जदार व जामीनदारांकडून होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात) यांना देय असलेली खाली तक्त्यात नमूद रक्कम वसुलीकरिता खाली दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे' या तत्वावर दि. ०३.१२.२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी १२.००** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/ जामीनदार / तारणकर्ता, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे :

| कर्जदार/सह–कर्जदार/ जमानतदार/तारण ठेवणाऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु.) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती व निरीक्षण तारीख |
|---|---|---|---|---|
| १. श्री. सुरेश गुरुनाथ सांगापूरकर (कर्जदार)<br>२. सौ.सुजाता सुरेश सांगापूरकर (सह–कर्जदार)<br>३ सौ. शशिकला गुरुनाथ सांगापूरकर (सह–कर्जदार)<br>सर्व सध्याच्या पत्त्यावर राहतात : ओंकारनगर, शाहूनगर, प्लॉट नं.१२०, केडगाव विठ्ठल–रुख्मीनी मंदिराजवळ अहमदनगर शहर, अहमदनगर महाराष्ट्र भारत ४१४००१.<br>मालमत्तेचा पत्ता: सर्व्हे क्रमांक ५०० १ केडगाव प्लॉट नं १२० केडगाव, केडगाव अहमदनगर–४१४००५<br>तारीख – ०४/०७/२०२५<br>ताबा आणि प्रकाराची तारीख<br>९ ऑक्टोबर २०२५ भौतिक ताबा<br>ज्ञात अधिभार ज्ञात नाही | मागणी सूचना दि.११–०७–२०२५.<br>०९–०७–२०२५ रोजी रु.२९,३१,२०१/– (एकोणतीस लाख ऐकतीस हजार दोनशे फक्त) आणि अधिक व्याज आणि इतर खर्च, शुल्क आणि खर्चासह.<br>कर्ज खाते क्रमांक **SLPHAMDR0000634** | रु. ५६,९५,०००/– (छपन्न लाख पंचाण्णव हजार फक्त)<br>बोली वाढविणे : १०,०००/– रुपये आणि अशा पटीत.<br>बयाणा ठेव रक्कम (ईएमडी) (रुपयात)<br>५,६९,५००/– रुपये (पाच लाख एकोणसत्तर हजार पाचशे फक्त)<br>ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख: २ डिसेंबर २०२५ वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० वा. | ०३ डिसेंबर २०२५<br>वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी १.००. | अश्फाक पत्का ९८१९४१५४७७<br>सुनील मानेकर ८९९९३४४८९७<br>मयूर भोजने ८८९८५२७०७६ मालमत्ता<br>निरीक्षण तारीख : ११ नोव्हेंबर २०२५ |
| **मालमत्तेचे वर्णन** तो सर्व तुकडा आणि पार्सल म्हणले या सर्व मालमत्तेत प्लॉट क्रमांक १२०, क्षेत्रफळ १८०.०० चौ.मी. असलेले प्लॉट समाविष्ट आहे. सर्व्हे क्रमांक ५००/१ (त्यावरील बांधकामासह), केडगाव, अहमदनगर. पूर्व: श्री. जाधव यांचे घर (सर्व्हे क्रमांक ४९९/१/४), पश्चिम: १५ फूट बिटुमेन रोड, उत्तर: श्री. कर्डिले यांचे घर (प्लॉट क्रमांक १२१), दक्षिण : खुला प्लॉट (प्लॉट क्रमांक ११९) | | | | |
| १. श्री. जाधव रमेश श्रीराम (कर्जदार)<br>२. सौ. सविता रमेश जाधव (सह–कर्जदार)<br>३. श्री. श्रीराम सोमा जाधव (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: रेणुका निवास, आखेगाव रोड, एमएसईबी ऑफिसजवळ, श्रीकृष्ण नगर, शेवगाव, अहमदनगर एमएसईबी, महाराष्ट्र–४१४५०२<br>मालमत्तेचा पत्ता: गट क्रमांक ७२४, प्लॉट क्रमांक १४, मालमत्ता क्रमांक–Z1W१००६७९१, ग्रामपंचायत क्रमांक ५२६५, आखतवाडे, अहमदनगर, महाराष्ट्र– ४१४५०२<br>एनपीएची तारीख – ०४/०७/२०२५<br>ताबा आणि प्रकार<br>२५ सप्टेंबर, २०२५ प्रतीकात्मक ताबा<br>ज्ञात अधिभार ज्ञात नाही | मागणी सूचना ११–०७–२०२५.<br>०९–०७–२०२५ रोजी रु.५६,०५,५२१/– (रुपये छप्पन लाख पाच हजार पाचशे एकवीस फक्त) आणि अधिक व्याज आणि इतर खर्च, शुल्क आणि खर्चासह.<br>कर्ज खाते क्रमांक **SLPHPNEP0000414** | रु. ७४,९०,४००/– (चौऱ्याहत्तर लाख नव्वद हजार चारशे फक्त)<br>बोली वाढविणे १०,०००/– रुपये आणि अशा पटीत.<br>बयाणा ठेव रक्कम (ईएमडी) (रुपयात)<br>७,४९,०४०/– रुपये (सात लाख एकोणपन्नास हजार चाळीस फक्त)<br>ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : २ डिसेंबर २०२५ वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० वा. | ०३ डिसेंबर २०२५<br>वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी १.००. | अश्फाक पत्का ९८१९४१५४७७<br>सुनील मानेकर ८९९९३४४८९७<br>मयूर भोजने ८८९८५२७०७६<br>निरीक्षण तारीख : ११ नोव्हेंबर २०२५ |
| **मालमत्तेचे वर्णन** तो सर्व तुकडा आणि पार्सल म्हणजे मालमत्ता म्हणजे प्लॉट क्रमांक १४, क्षेत्रफळ असलेले १६०.०० चौ.मी., गट क्रमांक ७२४/१ भागापासून, शेवगाव, ता.शेवगाव, जिल्हा अहमदनगर येथून. पूर्वेकडे : रस्ता, दक्षिणेकडे : प्लॉट क्रमांक १३, पश्चिमेकडे : प्लॉट क्रमांक ११, उत्तरेकडे : प्लॉट क्रमांक १५ | | | | |

०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.
०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव – ॲक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक– चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड यूटीआयबी ००००२३० येथे जमा करावी:

ठिकाण : अहमदनगर
दिनांक : २७.१०.२०२५

सही/– प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)


# शहर परिसरात जोरदार पावसाची हजेरी, नागापूर मंडलात अतिवृष्टीची नोंद; परतीच्या मान्सूनचा मुक्काम वाढला, ऑक्टोबर मध्ये बरसला ५३.२ मिमी पाऊस

नगर – ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत माघारी फिरणाऱ्या मान्सूनचा मुक्काम ३० ऑक्टोबरपर्यंत वाढला आहे. २७ ऑक्टोबर रोजी सकाळच्या ८ वाजेपर्यंतच्या २४ तासांत शहर परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. नागापूर मंडलात तर पुन्हा एकदा अतिवृष्टीची नोंद झाली. आहे.

शहरासह जिल्ह्यात गेल्या ३–४ दिवसांपासून पाऊस कोसळत आहे. २६ ऑक्टोबर रोजी रात्री जिल्ह्यात अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. शहराजवळील नागापूर मंडलात ६६.८ मिमी पाऊस झाला. त्यामुळे त्या परिसरात अतिवृष्टीची नोंद झाली. सावेडी मंडलात १४.५ मिमी, नालेगाव १.३ मिमी, कापूरवाडी २ मिमी, केडगाव ९.३ मिमी, भिंगार १.३ मिमी, जेऊर १ मिमी, वाळकी ६.५ मिमी, चास १८ मिमी, नेप्ती १३ मिमी अशी पावसाची नोंद झाली आहे.

तर जिल्हाभरात सरासरी ७.७ मिमी पावसाची नोंद झाली असून ऑक्टोबर महिन्यात मागील २६ दिवसांत ५३.२ मिमी पाऊस झाला आहे. हवामान खात्याने पुढील दोन दिवस यलो अलर्ट दिला आहे. त्यामुळे विजांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे.

मान्सूनचा पाऊस १ जूनपासून नोंदवला जातो. जिल्ह्याचे जून ते सप्टेंबर या ४ महिन्यातील सरासरी पर्जन्यमान ४४८.१ मिमी आहे. परंतू यावर्षी प्रत्यक्षात ५८९.२ मिमी पाऊस झाला. हे प्रमाण एकूण सरासरीच्या १३१.५ टक्के आहे. सप्टेंबर महिन्यांतील अतिवृष्टिमुळे जिल्हाभरातील शेती उध्वस्त झाली. त्यामुळे नकोसा झालेल्या पावसाच्या सरी अधून मधून बरसत आहेत. परतीचा पासून ऑक्टोबर महिन्यात पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यापर्यंत येत असतो. मात्र यावर्षी परतीच्या पावसाचा मुक्काम वाढला असून तो ३० ऑक्टोबर पर्यंत राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. यावर्षी पावसाळा बराच काळ लांबला आहे. मे महिन्यात महिनाभर अधून मधून अवकाळी पाऊस कोसळत होता. तर आता ऑक्टोबर संपत आला तरी पाऊस कोसळतच आहे. हा पाऊस कधी थांबणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



नगरमध्ये चिकनच्या दुकानात गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांसची विक्री करणाऱ्या टोळीला पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

